# पवित्र शास्त्रातील मंडळी

लेखक
जे.सी.चोट

अनुवादक
अमुल बनसोड

**World Literature Publication**
Winona/ Singapore / New Delhi/
Cape Town/ Madurai / Aurangabad (India)

अधिक माहितीकरिता खालील पत्त्यावर संपर्क साधावा.
ब्र. अमुल बनसोड
औरंगाबाद चर्च ऑफ ख्राईस्ट
एफ / ५, सियोन नगर, लेणी रोड,
पहाडसिंगपूरा, औरंगाबाद - ४३१००२.
(महाराष्ट्र)
मो. ०९०४९९४१०६, ०९९२२२६२०६७

## PUBLISHER'S STATEMENT

The book 'The Church of the Bible" written by Bro. J. C. Choate has been the most valuable availability, translated in to Marathi, for building up the faith of the believers in 'The Church of Christ" and to enroot the Christian indviduals, deep into the genuine vision of the genuine Church of Christ. It has been the long-felt need of the Marathi readers to read of the Church, its importance, functions and of the responsiblity of a member towards the body of Christ - the Church.

We are highly indebted to Sis. Paula & Bro. Jerry Bates for providing funds for taking this translation to our Marathi readers for growing spirituality and knowledge of the word of God.

It is strongly hoped, this book be the showers of blessings for the readers.

**In Christ Service**

**(Amul Bansod)**
Preacher:
Aurangabad Church of Christ
Co-Director:
Auragabad Bible College

• • •

# प्रस्तावना

पवित्र शास्त्रातील मंडळी संबंधी आपण आस्थेवाईक का असावे?

पवित्र शास्त्रातील मंडळी हीच आमच्या विचाराचा व अस्तित्वाचा केंद्रबिंदू असावा. जर ती मंडळी प्रभूची नाही तर तिचा विचार आम्ही का करावा ?

''मंडळी'' या रचनेचा खरा अर्थ समजून घेण्यासाठी पवित्र शास्त्राचा आधार घेणे आवश्यक आहे. म्हणूनच पवित्र शास्त्रातील मंडळीचे स्वरूप कोणते? हे प्रामुख्याने या पुस्तकामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

देवाच्या वचनानुरूप ''मंडळी'' या शब्दाचा अर्थ समजणे सोपे आहे. हे एक सत्य आहे की जेव्हा आपण ख्रिस्ताच्या मंडळीबाबत उत्सुक आहोत तेव्हाच ख्रिस्ती मंडळीचा अर्थ, तिचे महत्व व तिचे कार्य आपणास कळते आणि त्याच क्षणी, ''आपण त्या मंडळीमध्ये एक सभासद-घटक म्हणून आपले उत्तरदायित्व काय आहे? आपले मंडळीप्रती कर्तव्य कोणते आणि त्या मंडळीपासून आपणास काय लाभ आहे'' हे आपणास कळते.

पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रमासाठी, वास्तविकत: हे साहित्य तयार केलेले आहे. पवित्र शास्त्र-अभ्यास वर्ग किंवा व्यक्तीगत अभ्यासासाठी देखील ह्याचा उपयोग होऊ शकतो. ''पवित्र शास्त्रातील मंडळींचा अर्थ समजून घेण्यासाठी, या अभ्यासक्रमाचा मनापासून स्वीकार करून पवित्र शास्त्राचा अभ्यास केला तर निश्चितच यापासून मदत होणार आहे.''

''त्याला मंडळीमध्ये व ख्रिस्त येशूच्या ठायी युगानुयुग गौरव असो., आमेन'' (इफिस ३:२१)

**अमुल बनसोड**
औरंगाबाद चर्च ऑफ ख्राईस्ट
औरंगाबाद. (महाराष्ट्र)

• • •

# अनुक्रम


१) अध्याय-१. 'मंडळीचा अर्थ ७

*Lesson One*-Meaning of the Church

२) अध्याय-२. मंडळीची उभारणी १०

*Lesson Two*- The Coming of the Church

३) अध्याय-३. ख्रिस्ती मंडळीची स्थापना १३

*Lesson Three*- The Establishment of the Church

४) अध्याय-४. मंडळीची ओळख १६

*Lesson Four*- Identity of the Church

५) अध्याय-५. मंडळीचे नाव २०

*Lesson Five*-Name of the Church

६) अध्याय-६. मंडळीची रचना २४

*Lesson Six*-Organization of the Church

७) अध्याय-७. मंडळीमध्ये प्रवेश २८

*Lesson Seven*-Entering the Church

८) अध्याय-८. मंडळीची उपासना ३३

*Lesson Eight*-Worship of the Church

९) अध्याय-९. मंडळीचे कार्य ३७

*Lesson Nine*-Work of the Church

१०) अध्याय-१०. मंडळीचे ऐक्य ४२

*Lesson Ten*-Unity of the Church

११) अध्याय-११. मंडळीचा मतांगिकार ४६
*Lesson Eleven*-Creed of the Church

१२) अध्याय-१२. मंडळीचा इतिहास ५०
*Lesson Twelve*-History of the Church

१३) अध्याय-१३. सांप्रत काळातील मंडळी ५५
*Lesson Thirteen*- The Church Today

• • •

# अध्याय - १
# 'मंडळी' चा अर्थ

पवित्र शास्त्रांत मंडळी-ख्रिस्ताची मंडळी-याचा उल्लेख आहे हे सर्वमान्य आहे. परंतु "मंडळी"कोणाची ? किंवा कोणती मंडळी ? मंडळी काय आहे? या आणि अशा अनेक प्रश्नाची उत्तरे प्रसंगी उपलब्ध होतील. परंतु मंडळी म्हणजे काय? याचा विचार आपण करू. प्रथमत: मंडळी या संज्ञेचा नकारात्मकदृष्ट्या आपण विचार करू या. पवित्र शास्त्रात वर्णन केलेली "मंडळी" म्हणजे कॅथॉलिक मंडळी नव्हे, प्रॉटेस्टंट नव्हे की यहुदी मंडळी नव्हे ती विशेष किंवा संयुक्त नाव प्राप्त झालेली मंडळी नव्हे किंवा एक देश किंवा जमातीची मंडळी नव्हे. ती राजकीय संस्था नाही की केवळ सामाजिक संघटना नाही किंवा केवळ सभेचे गृह नाही जर या वरीलपैकी ती नाही तर त्या "मंडळीचे" स्वरूप कोणते ? माहिती नसल्यामुळे बहुमतात असलेल्या व्यक्तींनाही "मंडळी" या संज्ञेचा अर्थ कळत नाही. परिणाम स्वरूप, त्यांना त्याचा उद्देश, तिचे महत्त्व हे देखील समजत नाही.

परंतु पवित्र शास्त्रात त्याचा स्पष्ट उलगडा केलेला आहे. चर्च किंवा मंडळी हा शब्द ग्रीक भाषेतील 'एक्लेसिया" या शब्दापासून मिळालेला आहे. ज्याचा अर्थ 'बोलाविलेले लोक' असा आहे. तेव्हा मंडळी या शब्दाचा अर्थ असा आहे की 'बोलाविलेल्या लोकांची मंडळी' की जे देवाचा एकुलता एक पुत्र,त्याच्या राज्यासाठी या जगातून बोलाविलेले लोक (कलस्सै,१:१३) ते ख्रिस्ताच्या शरीरात असून, वैयक्तिरित्या त्याचे अवयव आहे (१ करिंथ-१२:२७) आणि ज्यांनी त्याची आज्ञा पाळली, त्यांचे तारण झाले व मंडळीमध्ये त्यांचा समावेश झाला (मार्क १६:१६; प्रेषितांची कृत्ये २:४७). याचा अर्थ असा की, 'मंडळी म्हणजे ख्रिस्ताच्या अनुयायांचा समुदाय' होय.

"मंडळी" हा शब्द पवित्र शास्त्रामध्ये दोन अर्थाने वापरला आहे.

१) सार्वत्रिक अर्थाच्या दृष्टीने त्याचा अर्थ की, "ख्रिस्ताला जे अभिप्रेत होते;

जेव्हा तो पेत्राला उद्देशून म्हणाला, "मी तुला असेही सांगतो, की तू पेत्र आहेस आणि या खडकावर मी माझी मंडळी बांधील आणि स्वर्गाची दारे बंद होणार नाहीत-मत्तय १६:१८ च्या सार्वत्रिक स्वरूपाच्या अर्थाबाबत पवित्र शास्त्रामध्ये याचप्रमाणे नमूद केलेले आहे. पवित्र शास्त्रात नमूद केलेल्या मंडळीप्रमाणे जगामध्ये कोठेही ख्रिस्ती मंडळी अस्तित्वात असल्यास, ख्रिस्ताने जी मंडळी बांधली आहे, ती तीच असणार."

२) स्थानिक स्वरूपाच्या अर्थाने त्याचा अर्थ असा की, "उदा. भिन्न मंडळ्यासंबंधी जेव्हा पौल रोम येथील मंडळीला लिहितांना, तो म्हणाला मंडळी तुम्हाला सलाम सांगतात. रोम १६:१६- तो अनेक मंडळीबाबत लिहित नाहीत परंतु स्थानिक ख्रिस्ती समुदायांसबंधी पौलाने लिहिले आहे. याच्या पुष्ठ्यर्थ, करिंथ, इफिस व फिलिप्पै येथील मंडळ्यांचा उल्लेख शास्त्रांत आढळतो (१ करिंथ १:२, इफिस-१:१, फिलिप्पै-१:१). "मंडळी"च्या प्रादेशिकतेच्या दृष्टीने विचार करणाऱ्या बांधवांना वरील उल्लेख गोंधळात टाकणारा वाटतो. पवित्र शास्त्रामध्ये पहिल्या प्रादेशिक मंडळीचा उल्लेख आढळत नाही. यापूर्वी अनेक बाबतीत अनेक समुदायांचा विचार करण्यात आला आहे आणि एका ठराविक संप्रदायामध्ये, असा विश्वासणाऱ्यांचा समुदाय 'ख्रिस्ताची मंडळी' होय. परंतु या सर्व विश्वासणाऱ्यांचा समुदाय मिळून एका सार्वत्रिक स्वरूपाच्या ख्रिस्ती मंडळींची रचना होते. प्रादेशिक भावनेचा विसर पडून, पवित्र शास्त्राच्या मार्गदर्शनानुसार ख्रिस्ताने रचना केलेल्या मंडळीचा अनुभव येतो.

"मंडळी" या शब्दाचा अर्थ अधिक स्पष्टपणे समजण्यासाठी पवित्र शास्त्रात रेखाटलेले मंडळीचे चित्र आपण समजावून घेऊ या.

**१) ख्रिस्ताचे शरीर :** ख्रिस्त, मंडळीचा मस्तक आहे म्हणून ती आत्मिक शरीर आहे (इफिस ५:२३).

**२) देवाचे गृह :** शास्त्रानुसार गृह म्हणजे कुटुंब / परिवार यामुळे मंडळी हेच देवाचे गृह होय हे स्पष्ट होते. १ ले तिमथी ३:१५ मध्ये पौल म्हणतो की, "देवाचे गृह हे जिवंत देवाची मंडळी होय. परमेश्वर पिता व आपण त्याची

लेकरे आहोत (गलती ३:२६-२७ इफिस १:३).

**३) देवाचे राज्य :** राज्य आहे तर राजा आहेच आणि ख्रिस्त राजा आहे (प्रकटी १७:१४). राजा असण्यासाठी राज्य अस्तित्वात असणे आवश्यक आहे. आपण त्यावर विश्वासणारे त्याची प्रजा; जग हे त्याचे राज्य आणि नवा करार हा त्याच्या व आमच्यामधील कायदा होय. मत्तय १६:१८-१९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ख्रिस्ती मंडळीचे स्वरूप हेच होय.

**४) प्रभूचा द्राक्षाचा मळा :** योहान १५:१-८ नुसार येशू खरा द्राक्षवेल असून त्यावर विश्वास ठेवणारे त्या वेलाचे फाटे आहेत. यामध्ये तो अर्थ अभिप्रेत आहे की प्रत्येक विश्वासणाऱ्याने ख्रिस्तामध्ये राहून फळ देणारा असले पाहिजे जेणे करून देवाचे गौरव व्हावे.

या मंडळ्याप्रमाणे ख्रिस्ताच्या मंडळीची व्याख्या करण्यात आली आहे. आत्मपरीक्षण करून देवाच्या वचनाच्या आधारे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. याप्रमाणे ईश्वराला अपेक्षित असलेली "मंडळी" आपणास ज्ञात झाली तर जीवनात बदल होणे आणि संपूर्ण जीवन बदलणे आवश्यक आहे.

• • •

# अध्याय - २
# मंडळीची उभारणी

अल्पावधीमध्ये कोणतीही मंडळी अस्तित्वात आलेली नाही. ती नियोजित भविष्य कथित व वचनदत्त होती. तदूनंतर तिची स्थापना करण्यात आली. पवित्र शास्त्रांत याचा स्पष्ट उल्लेख आढळतो.

प्रथमत: ती देवाच्या संकल्पात होती. पौल इफिस येथे संत-जणांना सांगतो, तो म्हणाला, "आपला प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो, त्यात स्वर्गातील सर्व आध्यात्मिक आशीर्वाद देऊन आपल्याला ख्रिस्तामध्ये आशीर्वादित केले आहे; त्याप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेंत पवित्र व निर्दोष असावे म्हणून त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला

(इफिस १:३-६ मध्ये लिहिल्याप्रमाणे) "त्याच्या कृपायुक्त वैभवाच्या स्तुतीसाठी. प्रिय ख्रिस्त येशूमध्ये, त्याने आपला स्वीकार केला." तो इफिस येथील मंडळीशी बोलत आहे हे नमूद करण्यासारखे आहे आणि तो म्हणतो की; जगाच्या स्थापनेपूर्वी देवाने त्यांना निवडले आहे. त्याचा अर्थ असा की,जग निर्माण केल्या जाण्यापूर्वी देवाचा ख्रिस्तीमंडळीविषयी संकल्प होता. असे की त्यावेळी देवाची, मंडळीविषयी योजना होती. म्हणून ती देवाच्या मनात रूजली होती. प्रारंभापासून देवाने योजिले आहे. त्याबाबत संकुचित रितीने विचार करणे किती अविचाराचे होईल!

दुसरे असे की, अनेक प्रसंगी मंडळीविषयी भविष्यवाणी करण्यात आली आहे. यशया म्हणाला, "शेवटच्या दिवसात असे घडून येईल, परमेश्वराच्या मंदिराचा डोंगर पर्वताच्या माथ्यावर स्थापण्यात येईल आणि सर्व डोंगराहून तो उंच होईल. त्याकडे सर्व राष्ट्रातील लोक लोटतील. (यशया २:२-३) योएल म्हणाला, "त्यानंतर असे घडून येईल की, मी माझा आत्मा

मानव जातीवर ओतीन, तुमचे पुत्र व कन्या भविष्य कथन करतील. वृद्ध स्वप्ने पाहतील, तरुण दृष्टांत पाहतील. त्या दिवसांत, चाकर आणि स्त्रिया यावर देखील मी माझा आत्मा ओतीन" (योएल २:२८-२९). नंतर दानिएलाने दर्शविले की, या राजांच्या कारकिर्दीत स्वर्गातील देव आपले राज्य स्थापन करील, ज्याचा कधीही नाश होणार नाही आणि ते राज्य दुसऱ्या कोणाचे असणार नाही ते त्यांचे तुकडे करील आणि त्या राजांचा नाश करील आणि ते सर्वकाळ टिकेल (दानि २:४४) आता यावरून आपण काही निष्कर्ष काढू या.

१) शेवटच्या दिवसांत राज्य स्थापन करण्यात येईल.

२) ते टेकड्यावर स्थापन करण्यात येईल.

३) सर्व राष्ट्रे त्याच्याकडे धाव घेतील.

४) परमेश्वर सर्व मानव जातीवर आपल्या आत्म्याचा वर्षाव करील.

५) चौथ्या जागतिक साम्राज्याच्या काळात ते स्थापन करण्यात येईल.

६) ते सर्व राष्ट्रांचा बिमोड करील व सर्व काळ टिकेल.

आता या सर्व घटनांची पूर्णता कोठे आहे. प्रेषित २ रा अध्याय वाचा.

**तिसरे :** मंडळी वचनदत्त होती. योहान म्हणाला, "तो दूर नाही (मत्त ३:२) याचा अर्थ असा की; ती लवकरच स्थापन करण्यात येईल. ख्रिस्त प्रभूने सांगितले, "मी तुला खचित सांगतो, तू पेत्र आहेस आणि या खडकावर मी माझी मंडळी रचिन आणि तिच्यापुढे अधोलोकांचे द्वारांचे काहीच चालणार नाही (मत्त १६:१८) आणि तो त्यांना म्हणाला, "मी तुम्हाला खचित सांगतो की; येथे उभे असणाऱ्यापैकी काही जण असे आहेत की, देवाचे राज्य सामर्थ्यानिशी दिसेपर्यंत त्यांना मरणाचा अनुभव येणारच नाही (मार्क ९:१) आणि तो त्यांना म्हणाला, "असे लिहिले आहे की, ख्रिस्ताने दु:ख सोसावे, तिसऱ्या दिवशी मेलेल्यामधून उठावे आणि यरूशलेमेपासून आरंभ करून सर्व राष्ट्रास त्याच्या नावाने पश्चात्ताप व पापक्षमा घोषित करण्यात यावी. तुम्ही या गोष्टींचे साक्षी आहात, पाहा माझ्या पित्याने देवू केलेली देणगी मी

तुम्हाकडे पाठवितो. तुम्ही स्वर्गीय सामर्थ्याने युक्त व्हाल तोपर्यंत ह्या शहरात राहा " (लुक २४:४६-४९).

आता खालील बाबी निरीक्षण करा.

१) देवाचे राज्य जवळ होते.

२) मृत्यू ऐवजी मंदिर उभारण्याचे वचन ख्रिस्ताने दिले.

३) त्याच्या स्थापनेच्या वेळी जे ख्रिस्ताबरोबर होते ते जिवंत राहतील.

४) ते सामर्थ्यानिशी येईल.

५) त्याच्या नावाने सर्व राष्ट्रास पश्चात्ताप व पापक्षमा घोषित केल्या जाईल.

६) त्याचा प्रारंभ यरूशलेमापासून होईल.

७) प्रेषित यरूशलेमामध्ये वरील सामर्थ्याने भरले जातील.

कृपया, ह्या सर्व बाबी मनात ठेवा, आपण ख्रिस्ताच्या मंडळीच्या स्थापनेपर्यंत येऊन पोचू आणि नंतर सर्व प्रगट होईल, याचा अनुभव घ्या.

आता प्रेषित अध्याय २ कडे वळू या. अनेकवार त्याचे वाचन करा. पवित्र शास्त्राचे अभ्यासक कबुली देतात की; यावेळी मंडळी स्थापन करण्यात आली होती.

आणखी ते स्थान यरूशलेम होते आणि तो शेवटचा काळ होता; रोमन साम्राज्याच्या राजाची कारकिर्द, सामर्थ्य प्रगट झालेले, पश्चात्ताप व पापक्षमा सर्व राष्ट्रास विदित केलेली असेल आणि त्यानंतर ख्रिस्ताची मंडळी अस्तित्वात आलेली असेल. अशा रितीने मंडळी, जी देवाच्या मनात होती, ती स्थापन झालेली होती. तिच्या संबंधीची भविष्यवाणी पूर्ण झालेली असेल आणि तीच परमेश्वराच्या वचनाची परिपूर्ती असेल.

● ● ●

# अध्याय - ३

# ख्रिस्ती मंडळीची स्थापना

**मा**गील अध्यायात आपण यशया २:२-३, योएल २:२८-२९ आणि दानि २:४४ मध्ये पाहिले की, देवाचे राज्य मंडळी शेवटच्या काळात यरूशलेमामध्ये स्थापन केल्या जाईल देवाच्या आत्म्याचा वर्षाव होऊन, सर्व राष्ट्रे त्यात न्हावून निघतील आणि ते सदैव टिकेल. मत्तय १६:१८ ; मार्क ९:१ आणि लूक २४:४६-४९ मध्ये देवाचे वचन दिले की; तो आपली मंडळी रचील. ते सामर्थ्याने युक्त असेल आणि त्याच्या नावाने सर्व राष्ट्रास पश्चात्ताप व पापक्षमा घोषित केल्या जाईल. प्रेषित दुसऱ्या अध्यायाचा विचार करता, आपणास निदर्शनास येते की, केवळ या अध्यायात भविष्यवाणी आणि वचन याची पूर्णता झालेली आहे.

जेव्हा प्रेषित २ मध्ये आपण वाचतो, आपणास आढळते की त्यावळी प्रेषित यरूशलेमामध्ये होते "नंतरःपेन्टेकॉस्ट म्हणजे पन्नासावा दिवसआला तेव्हा सर्व एकत्र जमले असता, अकस्मात मोठ्या वाऱ्याच्या सुसाट्यासारखा आकाशातून नाद झाला आणि ज्या घरात ते जमले होते ते सर्व त्याने भरले. अग्नीच्या जिभासारख्या वेगवेगळ्या झालेल्या जिभा त्यास दिसल्या आणि त्या प्रत्येकावर एक एक अशा बसल्या. तेव्हा ते सर्व पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि आत्म्याने जसे त्यास वदविले तसे ते अन्य भाषातून बोलू लागले. त्यावेळेस आकाशाखालच्या प्रत्येक राष्ट्रातील भक्तिमान यहुदी यरूशलेमात राहत होते. तो नाद झाल्यावर लोकसमुदाय एकत्र होऊन गोंधळून गेला. कारण की प्रत्येकाने आपापल्या भाषेत त्यास बोलतांना ऐकले " (प्रेषित २:१-६).

"ते सर्व चकित व विस्मित होऊन म्हणाले, व इतर कित्येक लोक थट्टा करून म्हणाले, हे नव्या द्राक्षरसाने मस्त झाले आहेत."

"तेव्हा पेत्र अकरा शिष्यांसुद्धा उभा राहून त्यास मोठ्याने म्हणाला,

अहो यहुदी लोकांनो व यरूशलेमातील सर्व राहणाऱ्यांनो, हे लक्षात आणा व माझे बोलणे ऐकून घ्या. तुम्हास वाटते, तसे हे मस्त झाले नाहीत. कारण हा दिवसाचा पहिला प्रहर आहे. परंतु हा प्रकार योएल संदेष्ट्याच्याद्वारे सांगितलेल्या संदेशाप्रमाणे घडला आहे तो संदेश असा."

"देव म्हणतो, शेवटच्या दिवसात असे होईल की,जो परमेश्वराच्या नावाचा धावा करील, तो तरेल "(प्रेषित २:१२-१७,२१) संदेष्ट्यांनी केलेल्या भविष्यवाणीप्रमाणे सर्व काही घडत आहे हे त्यांच्या निदर्शनास आणून पेत्र त्यांना संदेश देतो. तो त्यांना दाखवितो की येशू हा देवाला मान्य असलेला मनुष्य होता की ज्याच्याद्वारे देवाने त्यांच्यामध्ये पुष्कळ चमत्कार, अद्भूते व चिन्हे केली. शिवाय तो त्यांना सांगतो की; येशूला पकडून धर्म सभेपुढे नेण्यात आले आणि दुष्टाकरवी त्याला वधस्तंभी देऊन जीवे मारले आणि तो दर्शविते की देवाने त्याला मेलेल्यामधून उठविले व मृत्यूच्या वेदना नष्ट केल्या. लोक समुदायाची खात्री करून देण्यासाठी पेत्र दाविदाचा दाखला देतो की; ख्रिस्त जगात राहिला, तो मारला गेला; त्याला पुरले गेले आणि पुनरूत्थित झाला व देवाच्या शेजारी उजव्या हाताशी बसण्यासाठी वर स्वर्गात घेतला गेला.

आपले भाषण पुढे ठेवून पेत्र म्हणाला, "त्या येशूला देवाने उठविले, याविषयी आम्ही साक्षी आहोत. यास्तव तो देवाच्या उजव्या हस्ते उच्चपदी बसविलेला आहे व त्याला पवित्र आत्म्याविषयीचे वचन प्राप्त झाले आहे आणि त्याने, तुम्ही जे पाहाता व ऐकता त्याचा त्याने वर्षाव केला आहे. दाविद स्वर्गात चढून गेला नाही पण तो स्वत: म्हणतो,

परमेश्वराने माझ्या प्रभूला सांगितले की, "मी तुझे वैरी तुझ्या पायाचे आसन करीपर्यंत तू माझ्या उजवीकडे बैस."

यास्तव इस्त्राएलच्या सर्व घराण्याने हे निश्चयपूर्वक समजून घ्यावे की ज्या येशूला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारिले त्याला देवाने प्रभू व ख्रिस्त असे करून ठेवले आहे.

ऐ ऐकून त्यांच्या अंतकरणास चुरचूर लागली आणि ते पेत्र व इतर

प्रेषित यास म्हणाले, बंधुजनहो आम्ही काय करावे ? पेत्र त्यास म्हणाला, "पश्चात्ताप करा आणि पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नामात बाप्तिस्मा घ्या म्हणजे पवित्र आत्म्याचे तुम्हास प्राप्त होईल.

कारण ते वचन तुम्हास, तुमच्या मुलाबाळास व सर्व जे दूर आहेत त्यास म्हणजे जितक्यास प्रभू जो आपला देव स्वत:कडे बोलाविल, तितक्यास आहे आणि त्याने दुसऱ्या पुष्कळ गोष्टींची त्यास साक्ष दिली व बोध करून म्हटले, या कुटिल पिढीपासून तुम्ही आपला बचाव करून घ्या.

तेव्हा त्यांनी त्याचे वचन ग्रहण केले. त्यांचा बाप्तिस्मा झाला आणि त्या दिवशी सुमारे तीन हजार मनुष्यांची त्यांच्यात भर पडली.

देवाची स्तुती करीत, सर्व लोक त्यास प्रसन्न असत आणि तारणप्राप्ती झालेल्या इसमांची, प्रभू प्रति दिवशी, त्यांच्यात भर घालीत असे. (प्रेषित २:२-४१,४७)

या वरील शास्त्राच्या पाठात प्रभूची मंडळी रचण्यात आली. हे सर्व यरूशलेमात घडले आहे हे आपण पाहतो. पवित्र आत्म्याचा वर्षाव प्रेषितावर झालेला आहे. जे घडले ते म्हणजे, करण्यात आलेल्या भविष्यवाणीची पूर्णता होय. विशेष रितीने पेत्रा म्हणाला,

"हा प्रकार योएल संदेष्ट्याच्याद्वारे सांगितलेल्या संदेशाप्रमाणे घडला (प्रेषित २:१६) तेव्हा याबाबत संशयास वाव नाही.

यास्तव संदेष्ट्यांनी सांगितले होते की, शेवटच्या दिवसांत ह्या गोष्टी घडतील आणि संदेष्ट्यांनी सांगितल्याप्रमाणे घडत होते असे पेत्राने सांगितले. त्याप्रमाणे शेवटच्या काळात मंडळीची स्थापना करण्यात आली. त्या दिवशी सर्व राष्ट्रे उपस्थित होते. पश्चात्ताप व पापक्षमा सर्व राष्ट्रास घोषित करण्यात आला आणि सुमारे ३००० लोकांनी आज्ञा पाळली व तारण पावले त्यांची आणि मंडळीमध्ये भर पडली.

अशाप्रकारे इ.स. ३३ मध्ये ख्रिस्ताची मंडळी यरूशलेम येथे स्थापन झाली. आजतागायत ती टिकून आहे. ● ● ●

# अध्याय - ४
# मंडळीची ओळख

**फा**र पूर्वी हरविलेल्या मित्राचा शोध तुम्ही कसा कराल? साहजिकच त्याला ओळखण्याच्या सर्व खुणांची आपण माहिती करून घेवू आणि नंतर त्याचा शोध सुरू करू. त्याला ओळखण्याची प्रत्येक खुण पटल्यावरच, ज्याचा तुम्ही शोध करीत होता, तो तोच आहे, तेव्हा तुम्ही त्याचा स्वीकार कराल. त्याचप्रमाणे जगात पुष्कळ मंडळ्या आहेत. त्यामधील योग्य व खरी मंडळी कोणती आहे हे कसे ओळखता येईल ? ख्रिस्ताची मंडळी कोणती हे कसे ओळखता येईल? मंडळीच्या सर्व ओळखीच्या खुणांच्या त्या मंडळ्याबरोबर तुलना केलीच पाहिजे. आपल्या प्रत्येक खुणांनी ओळख पटल्यावरच, योग्य मंडळीविषयी तुमची खात्री होईल, पण त्या ओळखीच्या खुणा कोणत्या? त्या कोठे आढळतात ? पवित्रशास्त्र, या प्रश्नांचे उत्तर आहे.

पवित्र शास्त्र ख्रिस्ती मंडळीच्या खऱ्या ओळखीच्या खुणाविषयी माहिती देते. त्या खुणा कोणत्या आहेत याचा विचार आपण करूया.

१) ख्रिस्ताने मंडळी स्थापन केली "आणि मी तुला सांगतो, तू पेत्रस आहेस आणि या खडकावर मी माझी मंडळी रचीन व तिच्यापुढे अधोलोकांच्या द्वारांचे चालणार नाही." (मत्तय १६:१८).

२) तिची सुरूवात यरूशलमोत झाली लूक २४:४५-४९ आणि प्रेषित २:५मध्ये हे पाहावयास मिळते.

३) तिच्या स्थापनेची सुरूवात इ.स. ३३ मध्ये झाली. पन्नासाव्या दिवशी मंडळी स्थापन झाली, हे सुद्धा प्रेषित २ ऱ्या अध्यायामध्ये सिद्ध होते.

४) मंडळीने ख्रिस्ताचे नाव धारण केले. भिन्न समुदायाविषयी बोलतांना पौलाने लिहिले, "ख्रिस्ताच्या सर्व मंडळ्या तुम्हाला सलाम सांगतात" (रोम १६:१६) करींथ येथील मंडळीशी बोलतांना तो पुढे म्हणतो, "तुम्ही ख्रिस्ताचे

शरीर असून प्रत्येक जण आपापल्या कार्याप्रमाणे त्याचे अवयव आहात" (१ ले करिंथ १२:२७) पण शरीर काय आहे ? ते इफिस १:२२=२३ मध्ये सांगितले आहे. मंडळी हीच त्याचे शरीर आहे.

५) तिच्या अवयवांना / सदस्यांना "ख्रिस्ती" संबोधिले जात होते आणि शिष्यास ख्रिस्ती हे नाव पहिल्याने अन्त्युखियात मिळाले (प्रेषित ११:१६) तेव्हा अग्रीपाने पौलास म्हटले, "ख्रिस्ती व्हावे म्हणून थोडक्यानेच तू माझे मन वळवितोस"? (प्रेषित २६:२८).

ख्रिस्ती आहे म्हणून कोणी दु:ख सहन करितो तर त्याने लाजू नये. या नावामुळे देवाचे गौरव करावे (१ पेत्र ४:१६) आणि शेवटी स्मरण असावे की, "आणि तारण दुसऱ्या कोणाकडून नाही, जेणेकरून आपले तारण व्हावयाचे असे दुसरे नाम आकाशाखाली मनुष्यामध्ये दिलेले नाही." (प्रेषित ४:१२)

६) ख्रिस्त मंडळीचे मस्तक आहे "तोच शरीराचे म्हणजे मंडळीचे मस्तक आहे, तो आदि, मृतातून प्रथम जन्मलेला आहे. अशासाठी की सर्वांमध्ये त्याला प्राधान्य मिळावे" (कलस्सै १:१८).

७) मंडळी केवळ एकच आहे. "तुमच्या पाचारणाची जशी आशा एक त्याप्रमाणे शरीर एक व आत्मा एक आहे (एफिस ४-४). पण शरीर काय आहे; ती मंडळी होय" (कलस्सै १:१८). यास्तव जर शरीर एक आहे तर मंडळी एक आहे म्हणून मंडळी एकच आहे.

८) मंडळीत समाविष्ट होण्याच्या अटी. यामध्ये विश्वास (इब्री ११:६) पश्चाताप (प्रेषित १७:३०) विश्वासाची कबुली (रोम १०:९-१०) आणि बाप्तिस्मा (मार्क १६:१६) याचा समावेश आहे. तारण झालेल्यांची मंडळीत भर पडते (प्रेषित २:४७) रोम ६:३-४, गलती ३:२६-२७ आणि १ करिंथ १२-१३ आपणास आढळते की, कोणा एकाचा बाप्तिस्मा होऊन त्याचा मंडळीत समावेश होतो. या आज्ञांचे पालन केल्याने, "त्याचा मंडळीत, स्वर्गीय राज्यात नव्याने जन्म झाला" (योहान ३:३-५).

९) मंडळीची उपासना असामान्य आहे. आठवड्याच्या पहिल्या दिवशी पवित्र वचनाचे अध्ययन करणे, गीत गाणे, प्रार्थना करणे, प्रभू भोजनामध्ये सहभागी होणे आणि दान देणे यासाठी एकत्र जमतो (प्रेषित २०:७) (इफिस ५:१९) (प्रेषित २:४२) (१ करिंथ ११) (१ करिंथ १६:२)

१०) मंडळीचा सिद्धांत प. शास्त्रावर आधारभूत आहे. प्रभूच्या वचनात भर घालणे, त्यातून काही काढून टाकणे किंवा पुष्टी लवणे, अमान्य आहे. (प्रकटी २२:१८=१९) (गलती १:६-११) प. शास्त्र हा केवळ एकच सिद्धांत होय. इतर पुस्तके किंवा मतप्रणाली तुच्छ आहेत.

११) मंडळीची संघटना देवाच्या योजनेनुरूप असलीच पाहिजे. ख्रिस्त मंडळीचा मस्तक आहे. (इफिस ५:२३) प्रत्येक मंडळीस वडील पाळक असावा. (१ तिम ३, : तित.१) ख्रिस्तांच्या मंडळीचा अध्यक्ष ऐहिक वृत्तीचा नसावा किंवा तो राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय मनुष्य निर्मित समाज व्यवस्थेचा नसावा.

१२) मंडळीचे कार्य तिहेरी स्वरूपाचे आहे. सुवार्ता प्रसार करणे हे तिचे कार्य आहे. (मार्क १६:१५,१६) गरजवंताना मदत करणे (गलती६) याकोब-२ आणि सदस्यांना बोध करणे (इब्री ३:१२-१४)

१३) प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीने विश्वासयुक्त जीवन जगावे.

आपण जगावर प्रिती करू शकत नाही (१ योहान २-१५) (याकोब ४:४) परंतु आपण आत्म्याची फळे द्यावी (गलती ५:२२,२३) विश्वासणाऱ्यांना जीवनाचा मुकूट बहाल केला जाईल (प्रक. २:१०).

वर वर्णन केलेली ख्रिस्ती मंडळीची लक्षणे आहेत. पवित्र शास्त्रातील नमुन्यातून ती घेतलेली आहेत. आता याच्या साह्याने आपल्या मंडळीची तुलना करावी. उदा. १ली चार लक्षणे घेऊ.

आपण स्वत: विचारा -" माझी मंडळी कोणी स्थापन केली"?

"ती ख्रिस्ताने स्थापन केली होती की मनुष्याने ?"

नंतर विचारा "माझी मंडळी कोठे स्थापन करण्यात आली ?"

"तिचा उदय यरूशलेमात झाला की अन्य ठिकाणी झाला?"

पुन्हा विचारा, "ती केव्हा स्थापन झाली?" जर तिचा उदय इ.स.३३ नंतर झाला आहे तर ती प्रभूची मंडळी नाही. आणि शेवटी विचारा, "माझी मंडळी कोणते नाव धारण करते?"

जर तिला प्रभूचे नाव नाही तर ती ख्रिस्ताची कशी होईल"? तुम्ही अधिक प्रश्‍न विचारू शकाल परंतु तुमची मंडळी ख्रिस्ताची आहे की मनुष्यनिर्मित आहे हे समजण्यासाठी एवढे पुरेसे आहे.

या ओळखीच्या खुणा /लक्षणांसोबत दुसऱ्याही मंडळ्यांची तुलना तुम्ही करू शकता. अशासाठी त्या देवाच्या मंडळ्या आहेत की अन्य कोणाच्या आहेत.

मला खात्री आहे की जर आपण प्रामाणिक आहोत तर यातील फरक आपण ओळखू शकू. ज्या मंडळीचे तुम्ही सदस्य आहोत, ती पवित्र शास्त्रातील खरी मंडळी नाही हे ओळखू शकाल तर तिचा त्याग करा. सत्याचा अंगीकार करून जाणून घ्या, आज्ञापालन करा आणि देवाच्या वचनात ज्या मंडळीविषयी वाचतो, त्या मंडळीत सहभागी व्हा. ख्रिस्ताची मंडळी जेथे तारण आहे मुक्ती आहे,अशापैकी तुम्ही एक व्हाल.

• • •

# अध्याय - ५
# मंडळीचे नाव

मंडळी शास्त्रीय बनण्यासाठी तिला शास्त्रीय नाव असलेच पाहिजे. तथापि मनुश्य निर्मित नाव पदवी, अभिधान धारण केलेल्या मनुष्यनिर्मित मंडळ्या पुष्कळ आहेत हे कसे घडून आले? काही मंडळ्यांना लुथरनसारखे नाव, त्या त्या संस्थापकांच्या सन्मानासाठी देण्यात आलेले आहे. त्यांच्यापैकी काही बाप्तिस्मा किंवा प्रभूंची काम करण्याची पद्धती यास विशेष महत्त्व देतात. काही पन्नासावा दिवस की शब्बाथ दिवसाला मानतात तरी दुसऱ्या मंडळ्या तिच्या मुख्य असलेल्या व्यक्तीच्या अधिकारावर अधिक जोर देतात.

परंतु ह्या सर्व मंडळ्या किंवा इतर अन्य मंडळ्या, ख्रिस्ताचा मान सन्मान, वैभव, स्तुती स्वत:कडे ओढतात आणि मनुष्यांनी सुरू केलेल्या मंडळ्यांना मनुष्यनिर्मित नावे, पदव्या व मोठेपणा बहाल करतात.

मनुष्यनिर्मित नावे व पदव्या अनुचित आहेत त्याला अनेक कारणे असू शकतात.

१) त्या भेद निर्माण करतात. देवाला अप्रिय असलेली विभागणी ते मंडळीत आणतात. ते लोकास विभक्त करतात. आपण सर्वांनी एक असावे, अशा योहान-१७ व्या अध्यायात केलेल्या प्रार्थनेचा विरोध करतात.

२) शास्त्रात अशा मंडळ्यांचा धिक्कार करण्यात आला आहे. १ करिंथ १:१०-१७ मध्ये मनुष्यांची नावे धारण करून पक्ष व गट निर्माण करण्याची चूक, ख्रिस्ती बांधवांना दाखविली.

३) प्रभूच्या नावाऐवजी मनुष्यांच्या नावाचा वापर केला तरी देखील आपण ख्रिस्ताच्या नावाविषयी वाचतो. "तारण दुसऱ्या कोणाकडून नाही जेणेकडून आपले तारण व्हावे असे दुसरे नाव आकाशाखाली दिलेले नाही" (प्रेषित

४:१२)

४) मनुष्याने मंडळ्यांना दिलेली नावे फसवे, गोंधळयुक्त, विश्वास न ठेवणाऱ्या लोकांमध्ये चूक निर्माण करतात ही नावे अविश्वास पसरवितात.

५) अशी नावे धारण करणाऱ्यांना व ख्रिस्तापासून जे मागे गेलेले आहेत अशांना, त्यांच्यापासून हानी पोचविल्या जाते. या कारणामुळे ह्या मानव निर्मित मंडळ्या चूक व पापी आहेत.

ख्रिस्ताने त्याची मंडळी रचण्याचे वचन दिले (मत्तय १६:१८) असे लिहिले आहे की, "ती त्याने (ख्रिस्ताने) आपल्या रक्ताने विकत घेतली आहे (प्रेषित २०:२८) की तो शरीराचा (मंडळीचा) तारणारा व मस्तक आहे (इफिस ५:२३) (कलस्सै १:१८) या मंडळीच्या संस्थापकाला, रचणारा, तारणारा व मस्तकास सन्मान देण्यासाठी त्याचे नाव धारण करील हे स्वाभाविक आहे म्हणून जेव्हा पौलाचे रोम येथील मंडळीला लिहिले व त्या परिसरातील समुदायाला सलाम पाठविला. तो म्हणाला, "ख्रिस्ताच्या मंडळ्या तुम्हाला सलाम सांगतात. (रोम १६:१६). नंतर करिंथच्या मंडळीला लिहितांना तो म्हणाला, "तुम्ही ख्रिस्ताचे शरीर असून, प्रत्येकजण आपापल्या कार्याप्रमाणे त्याचे अवयव आहात(रोम १२:२७).

यास्तव हे शरीर त्याची मंडळी आहे (इफिस १:२२-२३) तर तो केवळ ख्रिस्ताच्या मंडळीविषयी बोलत होता. तिला देवाची मंडळी सुद्धा संबोधिले आहे (१ करिंथ १:२ प्रेषित २०:२८) देवाचे राज्य (१ करिंथ ६:९) ख्रिस्ताचे राज्य (इफिस ५:५) त्याच्या प्रियपुत्राचे राज्य (कलस्सै १:१३) आपल्या प्रभूचे राज्य (२ पेत्र १:११) मंडळी (प्रेषित १३:१) जिवंत देवाची मंडळी (१ तीमथी ३:१५) प्रथम जन्मलेल्याची मंडळी (इब्री १२:२३) इ.

म्हणून मंडळीला कोणत्याही विशेष किंवा वर्णनात्मक नावाने संबोधण्यात येवू नये.

त्याचसमयी स्मरण असावे की, मंडळी इतर कुणाची नसून, ती देवाची म्हणजेच ख्रिस्ताची मंडळी आहे आणि ती सर्व नावे ख्रिस्ताने

रचलेल्या मंडळीशी संबंधित आहेत. जर ती ख्रिस्ताची मंडळी नाही तर ती कोणाची मंडळी असावी ?

वरील सर्व नावे व वर्णनात्मक नावे पाहता, असे दिसेल, ख्रिस्ताच्या मंडळीला नाव देण्यासाठी, शास्त्रापासून दूर जाण्यासाठी उत्सुकता साहजिकच वाढेल. आपण पवित्र शास्त्रावर लक्ष केंद्रित करू आणि पवित्र शास्त्राप्रमाणे मंडळीला नाव देवू ती आपली योग्य कृती ठरेल.

मंडळीच्या सदस्यांच्या अवयवांच्या नावाबाबतीत शास्त्रांमध्ये स्पष्टीकरण आढळते. या संदर्भात यशया संदेष्टा म्हणाला की, "देव आपल्या लोकांना नवीन नाव देईल (यशया ६२:२) पौलाने असे नाव अनेक वर्षेपर्यंत धारण केले (प्रेषित ९:१५) परंतु यहुदी लोकांनी देवाच्या आज्ञेचे पालन केले नाही तोपर्यंत ते नाव द्यावयाचे नव्हते. सिरीयामधील अन्त्युखियातील शिष्यांना जेव्हा ख्रिस्ती म्हणून संबोधण्यात आले तेव्हा या वचनाची परिपूर्ती झाली. (प्रेषित ११:२६) नंतर पौल जेव्हा अग्रीपा राजाला शुभवर्तमान सांगत होता, त्याने प्रतिसाद देऊन पौलास म्हटले, "मी ख्रिस्ती व्हावे म्हणून तू थोडक्यानेच माझे मन वळवितोस (प्रेषित २६:२८).

शेवटी आम्ही वाचतो, जेव्हा पेत्र म्हणाला, "ख्रिस्ती म्हणून कोणी दु:ख सहन करतो, तर त्याने लाजू नये. त्या नावामुळे देवाचे गौरव करावे (१ पेत्र ४:१६) यास्तव हे स्पष्ट आहे की, नवीन कराराच्या काळात ख्रिस्ताचे अनुयायी ख्रिस्ती याच नावाने संबोधिले जात. आज प्रभूची आमच्या बाबतीत हीच इच्छा आहे. ख्रिस्ती या नावाबरोबर मोठेपणा सिद्ध करणारे नाव किंवा पदवी लावतो तर त्याचा अर्थ असा की, आपण खरे ख्रिस्ती नाही. या जगाच्या इतर नावापेक्षा ख्रिस्ती हे नाव भिन्न असून प्रभूला अशा नावाची आवश्यकता आहे.

मंडळी आणि तिच्या अवयवांच्या सदस्यांच्या नावामुळे ख्रिस्ताचे नाव उंचावण्यात यावे. याचे कारण कोणते? कारण की कुटुंबाचे नाव (इफिस ३:१४) जे सर्वात उच्च नाव आहे. (फिलिप्पै २:९-११) आणि ते नाव ज्यामध्ये आत्म्याचे तारण आहे (प्रेषित ४:१२) असे ते नाव आहे. म्हणून

ख्रिस्ताच्या नावावर आमचा विश्वास असावा. (१ योहा ५:१३) ते नाव कबूल करावे (२ तिम. २:१९) त्या नावात पश्चात्ताप करावा व बाप्तिस्मा घ्यावा. (प्रेषित २:२८) उपासनेसाठी त्या नावाने एकत्र यावे (मत्तय १८:२०) त्याच्या नावाने सर्व काही करावे (कलस्सै ३:१७) अशासाठी की त्याच्या नावावर आपणास अनंत कालिक जीवनाची प्राप्ती व्हावी (योहान २०:३०,३१) हे.

हे ध्यानात धरून या (ख्रिस्ताच्या) नावात काही नाही असे कोणीही म्हणणार नाही. मनुष्यनिर्मित नावामध्ये व उपाधीमध्ये सार्वकालिक जीवन खचितच नाही परंतु ही नावे धारण करणारे नाश पावतील.

उलटपक्षी ख्रिस्ताच्या नावात तारण आहे.

• • •

# अध्याय - ६
# मंडळीची रचना

ख्रिस्ताने मंडळीची रचना केली (मत्त १६:१८) संपूर्ण जगात ती पाचारण केलेल्या लोकांची बनलेली आहे. (कलस्सै १:१३,१४) ती तारण पावलेल्या लोकांची आहे (प्रेषित २:२७) ती आत्मिक शरीर आहे (कलस्सै १:१८) ती केवळ एक मंडळी आहे (इफिस ४:४).

जेव्हा मंडळी सार्वत्रिक स्वरूपाची असते तेव्हा ती शेकडो, हजारो व्यक्तींची बनलेली असते आणि प्रत्येक समुदाय पुष्कळ व्यक्तींनी बनलेला असतो याचा अर्थ असा की, मंडळीचा नियम स्थानिक असतो. राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय नसतो. दुसऱ्या अर्थाने असा की, प्रभूची मंडळी ऐहिक स्वरूपाची नसते, तिचा वडील स्वार्थी, जारकर्मी नसतो.

शास्त्र सांगते की, ख्रिस्त मंडळीचा मस्तक आहे. खालील वचनांचा आपण अभ्यास करू या.

"त्याने सर्व काही त्याच्या पायाखाली घातले आणि त्याने सर्वांवर मस्तक असे व्हावे म्हणून त्यास मंडळीला दिले हीच त्याचे शरीर, जो सर्वांनी सर्व भरतो त्याने, ती भरलेली आहे"(इफिस १:२२-२३) "कारण जसा ख्रिस्त मंडळीचा मस्तक आहे तसा नवराबायकोचं मस्तक आहे. तसेच खिस्त हा शरीराचा तारणारा आहे"(इफिस ५:२३). "तोच शरीराचे म्हणजे मंडळीचे मस्तक आहे. तो आदि मृतातून प्रथम जन्मलेला आहे. अशाठी की सर्वांमध्ये त्याला प्राधान्य मिळावे" (कलस्सै १:१८).

ही वचने आम्हास कोणती शिकवण देतात ? आधी नमूद केल्याप्रमाणे ख्रिस्त शरीराचे म्हणजे मंडळीचे मस्तक आहे. मस्तक किती आहेत? केवळ एक, दुसरा अन्य कोणी नसून ख्रिस्तच मंडळीचे मस्तक आहे.

मंडळी स्थानिक समुदायांची बनलेली असल्यामुळे, ख्रिस्त त्या मंडळीचा मस्तक असल्यामुळे, त्याचा अर्थ असा की, तो स्थानिक मंडळीचा

मस्तक आहे. या आधारावरच पौल म्हणाला, "प्रत्येक पुरुषाचे मस्तक ख्रिस्त आहे. स्त्रीचे मस्तक पुरुष आहे आणि ख्रिस्ताचे मस्तक देव आहे हे तुम्हाला समजावे, अशी माझी इच्छा आहे"(१ करिं ११:३).

दुसरे असे की, प्रत्येक स्थानिक मंडळीला आपली व्यवस्था असणे जरूर आहे. सभासदामधून वडील व सेवक शारीरिक व आध्यात्मिक गरजांसाठी नियुक्त करावयास पाहिजेत (इब्री १३:७) वडील लोकांनी मंडळीच्या शारीरिक गरजांकडे लक्ष पुरवावे (प्रेषित ६).

मंडळीमध्ये एक वडील क्करण्याऐवजी, बहुत वडील असण्याबाबत शास्त्रात उल्लेख आढळतो. एक मंडळी दुसऱ्या मंडळीचा ताबा घेतांना आपणास आढळत नाही. मंडळ्यांनी आपसात सद्भाव राखावा आणि दुसऱ्या मंडळीवर अधिकार गाजवू नये.

वडील, पाळक, बिशप, मेंढपाळ हे एकाच पदासाठी वापरण्यात आले आहे यास्तव मंडळीचा वडील, बिशप किंवा पाळकच आहे. १ तिम.३:१-७ मध्ये मंडळीच्या सेवकांच्या विशेषता वर्णन केल्या आहेत त्या अशा - "हे वचन विश्वसनीय आहे, कोणी अध्यक्ष होण्यास पाहतो तर तो चांगल्या कामाची इच्छा धरतो, अध्यक्ष अदृश्य, एका स्त्रीचा पती, नेमस्त, स्वस्थचित्त, शिष्ट, अतिथिप्रिय, सुशिक्षक असा असावा." तो मद्यपि व मारका नसावा तर सौम्य, भांडण न करणारा, द्रव्यलोभ न धरणारा, आपल्या घरची व्यवस्था चांगली ठेवणारा, आपल्या मुलाबाळांना भीड मर्यादेचे वळण लावून स्वाधीन ठेवणारा असावा. ज्याला आपल्या घरची व्यवस्था चांगली ठेवता येत नाही, तो देवाच्या मंडळीचा सांभाळ कसा करील ? त्याने मदांध होवून सैतानाच्या दंडात पडू नये म्हणून तो नवशिका नसावा. त्याची निंदा होवू नये व त्याने सैतानाच्या पाशांत सापडू नये म्हणून त्याने बाहेरल्या लोकांपासूनही चांगले नाव मिळविलेले असावे."

मंडळीच्या सेवकाला आवश्यक असलेल्या विशेषता, तित. १:५-९ मध्येही वर्णन केलेल्या आहेत. याचा अर्थ असा की प्रत्येकाला मंडळीचा वडील बनता येणार नाही. वरील विशेषता धारण करणऱ्याला वडील म्हणून

नियुक्त करण्यात यावे. तरी सुद्धा अशा सेवकांचे मंडळीत बहुत्व असावे जर मंडळीमध्ये वडील बनण्यासाठी योग्य व्यक्ती नसल्यास ते वडील म्हणून होण्यास जोपर्यंत आवश्यक ती पात्रता संपादन करीत नाहीत तो पर्यंत मंडळीतील व्यक्तींनी सर्व व्यवहार सांभाळावा.

वडीलांसोबत सेवा करण्यासाठी सेवकांची नियुक्ती करण्यात यावी. ते पंक्तीसेवा करणारे सेवक म्हणून स्थानिक वडिलांच्या मार्गदर्शनानुसार कार्य करतील. पौल त्यांच्यासाठी पात्रता कथन करतो.

''तसेच सेवकही गंभीर असावे. दुबोल्ये, मद्यपानासक्त व पैसा खाणारे नसावे. विश्वासाचे गूज शुद्ध विवेकाने राखणारे असावे. त्यांचीही पूर्वी परीक्षा व्हावी आणि अदृश्य ठरल्यास त्यांनी सेवकपण करावे तसेच स्त्रिया गंभीर असाव्या, चहाड नसाव्या. नेमस्त व सर्व गोष्टीविषयी, विश्वासू असाव्या. सेवक एका स्त्रीचा पती असावा. ते आपल्या मुलाबाळांची व घरची व्यवस्था चांगली ठेवणारे असावे. कारण ज्यांनी सेवकपण चांगले चालविले ते आपणास चांगली योग्यता आणि ख्रिस्त येशूवरील विश्वासात फार धैर्य मिळवितात'' (१ तिम. ३:८-१३).

मंडळीची संघटना दैवी स्वरूपाची आहे. वडील आणि सेवक असलेल्या प्रत्येक मंडळीचा ख्रिस्त मस्तक आहे. सुवार्तिक,शिक्षक व सदस्य ह्यांच्यावर त्यांचा अधिकार राहील.

प्रभूच्या संकल्पानुसार जर एक मंडळी सत्याला चिकटून राहिल्यास ती विश्वासू आहे असे सिद्ध होईल.

देवाच्या संकल्पानुसार प्रत्येक मंडळी स्वयंशासीत किंवा दुसऱ्या मंडळ्यापासून स्वतंत्र आहे. मंडळ्या मनुष्यनिर्मित बंधनाने बांधलेल्या नाहीत. परंतु प्रीतीच्या बंधनांनी बांधलेल्या व रचिलेल्या आहेत म्हणून त्यांच्यामध्ये, सद्भाव पाहावयास मिळतो आणि एकमताने क्रियाशील असतात कारण ख्रिस्तामध्ये त्या अनेक असून एक आहेत.

शास्त्रामध्ये, पेत्र किंवा अन्य कोणी मंडळीचा मस्तक मुख्य असल्याचे वाचण्यात येत नाही तसेच कुणी बिशप आपले प्रभुत्व मंडळीवर चालवित

असल्याचे वाचण्यात येत नाही किंवा कुणी पाळक अथवा सुवार्तीकही तिचा मस्तक असल्याचे आढळत नाही. धार्मिक म्हणवून घेणारे देवाच्या मंडळीच्या बाहेर पडले आहेत आणि आज जगात फूट व भेदभाव असल्याचे तेच मुख्य कारण होय. म्हणून मंडळीच्या सार्थ संघटनेच्या आदर्शासाठी पवित्र शास्त्रातील मंडळीचा निर्धारपूर्वक विचार करावयास हवा.

• • •

# अध्याय - ७
# मंडळीमध्ये प्रवेश

**आ**तापर्यंत केलेल्या अभ्यासामध्ये, ख्रिस्ताच्या मंडळीचे विशेष महत्त्व समजावून घेतले आहे. शास्त्रात नमूद केल्याप्रमाणे ख्रिस्त मंडळींसाठी मरण पावला हे पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे (इफिस ५:२५) की त्याने मंडळीला आपल्या रक्ताने विकत घेतली (प्रेषित २०-२८), ख्रिस्त हा तिचा तारणारा आहे (इफिस ५:२३).

खालील प्रश्न उभे राहतात.

१) महत्त्वहीन बाबींसाठी ख्रिस्त मरेल काय?

२) योग्यताहीन मंडळीला विकत घेण्यासाठी ख्रिस्त आपले रक्त सांडेल काय?

३) तो अशा मंडळीचा तारणारा बनेल की तारण इतर कुणाकडून प्राप्त होईल?

वरील प्रश्नांच्या उत्तरासाठी आपले उत्तर "नाही" असेच असणार आणि ते सत्य आहे.

मंडळीचे सदस्य असल्याशिवाय तारण होणार नाही असे का म्हटले आहे?

त्याचे कारण असे की, "मंडळी" याचा अर्थ काही लोकांनी समजून घेतला नाही व त्यांनी आपली फसवणूक करून घेतली.

मंडळीद्वारे आपले तारण होते असे पवित्र शास्त्र शिकवित नाही परंतु तरले जाण्यासाठी मंडळीमध्ये असणे आवश्यक आहे हे मात्र सत्य आहे. जसे नोहाचे तारू, तारणारा नव्हे तरी महापुरापासून बचाव करण्यासाठी नोहा व त्याच्या कुटुंबास तारूमध्ये जाणे आवश्यक होते. तद्वतच ख्रिस्त तारलेल्यांची मंडळीमध्ये भर घालतो. जेव्हा लोकांनी शुभवर्तमान ऐकले

आणि आज्ञा पाळली त्यानंतर असे वाचावयास मिळते की, "आणि तारण पावलेल्या इसमांची प्रभू प्रतिदिवशी मंडळीत भर घालीत असे"(प्रेषित २:४७).

यास्तव जर कोणाचे तारण झाले आहे, तर तो ख्रिस्ताच्या मंडळीचा अवयव आहे. जर तो मंडळीचा अवयव नाही तर तो तारलेला नाही. ही साधी-सोपी बाब आहे. दुसऱ्या शब्दात असे की, मंडळीच्या बाहेर अलिप्त राहून एखाद्याचे तारण होणार नाही तसेच ख्रिस्ताच्या मंडळीचा, शरीराचा अवयव बनल्याशिवाय तारण होणार नाही.

ख्रिस्त तारलेल्यांची भर मंडळीमध्ये घालतो. ज्याअर्थी ख्रिस्त तारलेल्यांची मंडळीमध्ये भर घालतो, त्याअर्थी मंडळी तारलेल्यांची बनलेली आहे. आज्ञांचे पालन खरेपणाने करण्यात येते की नाही हे पाहण्यासाठी प्रभू आपले हृदय व वर्तन पडताळून पाहतो. जर वर्तनात खरेपणा आहे तर प्रभू त्याची मंडळीमध्ये भर घालील. त्याला मंडळीमध्ये प्रवेश मिळेल. जर खरेपणा नसला तरीही आपण त्याचा स्वीकार केला; कारण त्याने बाह्य कृतीने आज्ञापालन केले आणि आपण त्याचे हृदय पडताळून पाहण्यास असमर्थ असल्याने, देव मंडळीमध्ये त्याची भर घालणार नाही. मंडळीमध्ये घालण्यात येणारी भर प्रभूची जबाबदारी आहे. तारण पावलेल्यामध्ये कोण असावे व नियमानुसार मंडळीत मिळणे याबाबतीत प्रभू चूक करीत नाही.

यास्तव ख्रिस्त मंडळींचा किंवा शरीराचा तारणारा असल्यामुळे, तो केवळ तारण पावलेल्यांची मंडळीत भर घालतो. ख्रिस्ताच्या मंडळीमध्ये प्रवेश होण्यासाठी प्रभूला काय पाहिजे; याविषयी मंडळी व प्रवेश घेण्यास ज्ञान असावे. देवाच्या वचनामध्ये स्पष्टपणे हे नमूद केलेले आहे. "प्रेषिताची कृत्ये" यामध्ये परिवर्तनाच्या बाबतीत स्पष्ट केलेले आहे.

प्रभूच्या मंडळीमध्ये प्रवेश मिळविण्याच्या निश्चित अटी व निश्चित वर्तनक्रम कोणता त्याचा अभ्यास करू या. मंडळीमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी:

**१) सत्य श्रवण करणे :**

"याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाने होते" (रोम १०:१७).

**२) देव आणि ख्रिस्तावर विश्वास ठेवला पाहिजे :**

"आणि विश्वासावाचून त्याला संतोषविणे अशक्य आहे. कारण देवाजवळ जाणाऱ्याने असा विश्वास धरला पाहिजे की, तो आहे आणि त्याजकडे धाव घेणाऱ्याला तो प्रतिफळ देणारा होतो" (एबी ११:६).

ख्रिस्त म्हणाला, "तुमचे अंत:करण अस्वस्थ होऊ देऊ नका. देवावर विश्वास ठेवा आणि माझ्यावरही विश्वास ठेवा" (योहान १४:१).

**३) पापाबद्दल पश्चात्ताप केला पाहिजे :**

"मो तुम्हाला सांगतो (पापी) नव्हते, तरी पण तुम्ही पश्चात्ताप न केल्यास सर्व त्याप्रमाणे नाश पावाल" (लुक १३:३).

**४) ख्रिस्त देवाचा पुत्र आहे असे कबूल करावे :**

ख्रिस्त स्वत:ला म्हणाला, "जो कोणी मनुष्यासमोर मला स्वीकारील, त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर स्वीकारीन" (मत्तय १०:३२).

**५) पापक्षमेसाठी बाप्तिस्मा घेतला पाहिजे :**

बाप्तिस्मा म्हणजे पाण्यात डुबणे होय (रोम ६:३ प्रे.कृ. ८:२६-३९). "जो विश्वास धरतो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल, जो विश्वास धरत नाही, तो दंडास पात्र होईल"(मार्क १६:१६).

नंतर पेत्र त्यांना म्हणाला, "पश्चात्ताप करा आणि पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नामात बाप्तिस्मा घ्या म्हणजे पवित्र आत्म्याचे दान तुम्हास प्राप्त होईल" (प्रेषित २:३९).

या पाठात आपण काय शिकलो ? आपणास आढळले की प्रभू मंडळीमध्ये तारलेल्यांची भर घालतो. याचा अर्थ असा की, जो देवाची आज्ञा पाळतो व तारलेला आहे. साहजिकच मंडळीमध्ये त्याला प्रवेश मिळतो.

याप्रमाणे आपण हे पाहिले आहे की, सत्य श्रवण केल्याने, विश्वास ठेवून, पापाबद्दल पश्चात्ताप करून, ख्रिस्ताला कबूल करून आणि बाप्तिस्मा घेतल्याने तारण प्राप्त होते. जेव्हा प्रत्येक जण ह्या कृती करतो, त्याला मंडळीमध्ये प्रवेश मिळतो. कारण देवाच्या वचनाचे आज्ञापालन ही एक योजना आहे. ज्यामुळे आपण तरले जावू व देव मंडळीमध्ये आपली भर घालील. आहे की नाही सहज-सोपा उपाय.

दुसऱ्या अर्थाने असेही म्हणता येईल, "प्रभू म्हणाला, की पाण्याने व आत्म्याने जन्मल्यामुळे देवाच्या राज्यात प्रवेश मिळू शकतो" (योहा ३:३-५).

पण राज्य म्हणजे काय? ती देवाची मंडळी होय (मत्त १६:१८-१९). मंडळीमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी देवाचे दोन भिन्न मार्ग आहेत काय? निश्चितच नाही.

यास्तव जेव्हा आपण विश्वास ठेवतो आणि बाप्तिस्मा घेतो (त्याच्या आत्म्याद्वारे जन्म घेऊन व त्याची आज्ञा पाळून) तर देवाच्या राज्यात किंवा त्याच्या कुटुंबात म्हणजेच त्याच्या मंडळीमध्ये नवीन जन्म होतो, प्रवेश मिळतो.

पौल म्हणतो की, "आपणा सर्वांस एका आत्म्यात एक शरीर होण्यासाठी बाप्तिस्मा मिळाला आहे"(१ करिंथ १२:१३), पण हे शरीर कोणते ? ते शरीर, मंडळी होय (कलस्सै १:१८). शरीरे किती आहेत ? केवळ एक. (इफिस ४:४, १:२२) त्यामध्ये प्रवेश कसा मिळतो ? बाप्तिस्मा घेण्यामुळे प्रवेश मिळतो.

ख्रिस्त म्हणतो, "तारण पावण्यासाठी विश्वास ठेवला पाहिजे व बाप्तिस्मा घेतला पाहिजे" (मार्क १६:१६) ह्याकरिता येथील विश्वासणाऱ्यांनी हेच केले (प्रेषि १८:८).

यास्तव जेव्हा आपण मंडळीमध्ये बाप्तिस्मा घेतो तर आपण मंडळीचा एक हिस्सा बनतो व मंडळीत मिळतो.

तारण प्राप्त होण्यासाठी एकच मार्ग आहे आणि आपण पाहिले आहे की, प्रभू तारण पावलेल्यांची मंडळीमध्ये भर घालतो.

पवित्र शास्त्रात वाचलेल्या मंडळीचे आपण सभासद आहात काय? जर नाही तर आपण तारलेले नाही.

पडताळून बघा, अध्ययन करा. प्रभूची आज्ञा माना आणि तो स्वत: मंडळीमध्ये तुमची भर घालील.

• • •

# अध्याय - ८
# मंडळीची उपासना

**ता**रलेल्यांची मंडळी बनलेली असते. येशू ख्रिस्ताद्वारे उपासना करणे व देवाची सेवा करणे हा तिचा हेतू आहे. पौल म्हणाला, "आणि बोलणे किंवा करणे जे काही तुम्ही करता ते सर्व येशू प्रभूच्या नामाने करा. त्याच्याद्वारे देव जो पिता त्याचे उपकारस्मरण करा" (कलस्सै ३:१७).

नवीन करारामध्ये तीन प्रकारच्या उपासना दर्शविण्यात आल्या आहेत.

**१) अजाणतेपणी केलेली उपासना :**

अथेन्स येथील टेकडीवर समुदायामध्ये पौल असताना, त्याने त्याच्याभोवती पुष्कळ मूर्ती पाहिल्या आणि म्हणाला, "तर मी फिरता फिरता तुमच्या पूज्य वस्तू पाहिल्या, त्यात "अज्ञात देवाला" ही अक्षरे लिहिलेली वेदी मला आढळली, ज्यांचे तुम्ही न ओळखता भजन करता, ते मी तुम्हाला जाहीर करतो"(प्रेषि १७:२३). जसे तेथे अजाणतेपणी उपासना करणारे होते, त्याचप्रमाणे आजही अशी उपासना करणारे आहेत. मूर्ती आणि पूज्य वस्तू यांची पूजा करणारे आज लाखो लोक आहेत त्याचप्रमाणे शास्त्रासंबंधी अजाण असणारे लाखोपेक्षा अधिक लोक निरनिराळ्या धार्मिक प्रथांचा अवलंब करतात.

**२) निरर्थक उपासना करणाऱ्यासंबंधी प्रभूचे शब्द आहेत.**

ख्रिस्त म्हणाला, "ते मनुष्यांचे नियम, शास्त्र म्हणून शिकवून माझी निरर्थक भक्ती करतात" (मत्तय १५:९). आज याप्रकारे बहुसंख्य लोक भक्ती करतात. ते प्रभूची भक्ती करतात, हे सत्य आहे;परंतु त्यांची भक्ती व्यर्थ व पोकळ असते. कारण परमेश्वराच्या इच्छेला मान्य असलेल्या भक्तीऐवजी मनुष्याचे नियम व शिकवणी व परंपरेनुसार ती असते.

**३) देवाचे वचन खऱ्या भक्तीविषयी सांगते, जी आत्म्याने व खरेपणाने केली जाते.**

ख्रिस्ताचे वचन आपण वाचतो, "देव आत्मा आहे आणि त्याच्या उपासकांनी त्याची उपासना आत्म्याने व खरेपणाने केली पाहिजे" (योहान ४:२४). देवाला मान्य असलेली हीच खरी उपासना होय. येशू ख्रिस्ताच्या काळात जितके हे खरे होते तेवढेच ते आजच्या युगात खरे आहे (जसे लिहिलेले आहे) देवाला (विनयशिलतापूर्वक व जाणतेपणी) केलेली (खरेपणाने) ही उपासना करण्यासाठी देव बळजबरी करीत नाही. परंतु उपासना करणाऱ्यांने ती स्वयंस्फूर्तीने करावी.

प्रभूच्या मंडळीने कोणत्या प्रकारच्या प्रार्थनेत व्यस्त असावे? अजाणतेपणी केलेल्या उपासनेत निश्चितच नाही. ती मनुष्यांनी केलेले नियम व शिकवणीनुसार नसावी. आत्म्याने व खरेपणाने केलेली अशी देवाला मान्य असलेली उपासना असावी.

नवीन करारामध्ये आज्ञापिल्यानुसार प्रारंभीच्या देवाच्या मंडळीमध्ये प्रचलित असलेल्या उपासनेच्या प्रकारामध्ये खालील बाबी निदर्शनास येतात.

**१) ते अध्ययन करण्यासाठी एकत्र येत असत.**

बालपणापासून तिमथ्याला शास्त्राची शिकवण देण्यात आली (२तीम ३:१५) तरी देखील तरूण सुवार्तिक म्हणून पौलाने त्याला उपदेश केला, "तू सत्याचे वचन नीट सांगणारा, लाज वाटण्यास कसलेही कारण नसलेला कामकरी असा देवाला पटलेला, असा स्वत:ला सादर करण्यास होईल तितके कर" (२ तीम. २:१५) हे सर्व ख्रिस्ती व्यक्तींना लागू आहे. विशेष करून उपासना करणाऱ्या ख्रिस्ती लोकांसाठी आवश्यक आहे.अशा समयी देव आपल्या वचनाद्वारे आपल्या लेकरांशी बोलतो. प्रेषित २०:७ मध्ये वाचावयास मिळते की अध्ययनाचे साधन म्हणून तो आपल्या बांधवांना सुवार्ता गाजवित होता.

**२) ते प्रार्थना करीत असत.**

पन्नासाव्या दिवशी लोकांनी प्रभूचे आज्ञापालन केल्यानंतर आपण वाचतो, "ती प्रेषितांच्या शिक्षणात, संगतीत, भाकर मोडण्यात व प्रार्थना करण्यात तत्पर असत" (प्रेषित २:४२). प्रार्थनेद्वारे देवाच्या लेकरांना स्वर्गातील पित्याबरोबर संभाषण करण्यासाठी संधी उपलब्ध होते. उपासनेसाठी विश्वासणाऱ्यासोबत एकत्र जमणे व प्रार्थनेत तत्पर नसणे याबाबत आपण काय विचार करतो ?

**३) ते स्तुती गान करीत.**

पौलाने आपल्या बंधुजणांना लिहिले, "स्तोत्रे,गीते व आत्मिक प्रबंध एकमेकास म्हणून दाखवा. आपल्या अंतकरणात प्रभूला गायन-वादन करा" (इफि.५:१९). तसेच (कलस्सै ३:१६) गायन-वादन (संगीत) दोन प्रकारचे आहे. १) कंठोच्चारित संगीत २) यंत्रशास्त्रावर आधारित संगीत. देवाला कोणत्या प्रकारचे संगीत, गायन, वादन पसंत आहे? देवाला कंठोच्चारित संगीत मान्य आहे. पौल म्हणतो, अंत:करणाच्या मधूर सुरांनी प्रभूला संतुष्ट करावे. ते यंत्रवाद्यावर आधारित संगीतास बाजूस सारते.

प्रारंभीच्या ख्रिस्ती बांधवांनी देवाला स्तुतीगान गायिले. काळाच्या ओघात मानवाने यंत्रशास्त्र संगीताची भर घातली. परंतु देवाने त्यास मान्य केले नाही. तो त्याचा स्वीकार करणार नाही.

ख्रिस्ती विश्वासणारे प्रार्थना करू शकतात पण ते यंत्रशास्त्रावर आधारित संगीताच्या साधनांनी देवाचे स्तुतीगान करू शकत नाही.

**४) प्रभू भोजनात सहभागी होण्यासाठी ते एकत्र जमत असत.**

प्रेषित २०:७ मध्ये याचे उदाहरण पहावयास मिळते मत्तय २६:२६-२८ व १ करिंथ ११ व्या अध्यायात 'ख्रिस्ताच्या शरीराच्या स्मरणार्थ, भाकरीतून खाण्यासाठी सहभागी होण्याकरिता व त्याच्या रक्ताच्या स्मरणार्थ, प्याल्यातून द्राक्षरस पिण्यासाठी, सहभागी होण्याकरिता शिकवण आपणास मिळते आणि आजतागायत प्रभूच्या स्मरणार्थ आपणास करावयाचे आहे.

**५) ते आपले धन दानाच्या रूपात देत असत.**

गलतिया आणि करिंथ येथील बांधवांना पौलाने आज्ञापिले, "आठवड्याच्या १ ल्या दिवशी तुम्ही प्रत्येकाने तसे आपणास यश मिळाले असेल त्याप्रमाणे आपणाजवळ द्रव्य जमा करून ठेवावे यासाठी मी येईन तेव्हा वर्गण्या होवू नयेत" (१ करिंथ १६:२), २ करिंथ ९:७ देखील वाचा.

प्रत्येक आठवड्याच्या पहिल्या दिवशी प्रारंभीचे ख्रिस्ती बंधू एकत्र जमत असत. (प्रेषित २०:७; १: करिंथ १६:२) त्यांना ताकीद देण्यात आली होती, "आपण कित्येकांच्या चालीप्रमाणे आपले एकत्र मिळणे, सोडू नये तर एकमेकास बोध करावा आणि तो दिवस जवळ येत आहे हे तुम्ही पाहता म्हणून विशेष करून करावा" (इब्री १०:२५). आजच्या ख्रिस्ती बांधवांनी त्याच दिवशी उपासनेमध्ये मग्न असावे म्हणून तोच उपदेश आपणासाठी देखील आहे.

मंडळीच्या उपासनेची पद्धत इतकी सरळ, सोपी आणि व्यवस्थित आहे की, उपासनेच्या साधेपणामुळेच अनेक घोटाळतात. ती परंपरेनुसार लांब अवधीची, कंटाळवाणी आणि प्रार्थनेची पुनरावृत्ती अशी वाटते. पण हा प्रकार असा नाही, परमेश्वराने उपासनेच्या बाबतीत आपली इच्छा प्रगट केली आणि ती मनुष्याकडून किंचित देखील बदलावयाची नाही. त्यामध्ये भर घालणे किंवा काही भाग काढून टाकणाऱ्यावर देवाचा कोप होईल. देव बोलला आहे आणि त्याच्या लोकांनी त्याची आज्ञा पाळावी, तरच देवाची उपासना होईल, त्याचे स्तुतीगान होईल आणि तो सन्मानीत होईल.

• • •

# अध्याय - ९
# मंडळीचे कार्य

मंडळीचे अस्तित्व का आहे? तिचा हेतू कोणता? तिचे कार्य कोणते ? यासाठी आपण देवाच्या वचनांचा अभ्यास करू या.

सर्वप्रथम आपण पाहू की व्यवहार करणे, शाळा किंवा दवाखाने सुरू करणे व चालविणे हे मंडळीचे कार्य नाही. पैसा उभारण्यासाठी पुस्तकांचे प्रकाशन करणे व विक्री करणे हेही मंडळीचे कार्य नव्हे. या सर्व गोष्टी चांगल्या असतील. ख्रिस्ती बांधवांना हे करण्याचा हक्क असेल पण मंडळीचे केवळ हेच कार्य नाही.

धार्मिक क्षेत्र अधिकाधिक या व अशा बाबीकडे अधिक झुकलेले आहे व देवाच्या पवित्र शास्त्रातील योजना त्याच्या लोकांसाठी करावयाचे कार्य यापासून पाऊल मागे जात आहे.

पवित्र वचनाचा अधिकाधिक अभ्यास केल्यास, आपणास आढळून येईल की देवाच्या मंडळीचे कार्य तिहेरी स्वरूपाचे आहे. सुवार्ताप्रसार, गरजूंना सहाय्य करणे व मंडळीची बांधणी करणे यावर आपण विचार करू या.

### १) सुवार्ता प्रसार / शुभवर्तमान गाजविणे.

ख्रिस्ताने त्याच्या पुनरूत्थानानंतर व स्वर्गारोहणापूर्वी, शिष्यांना सांगितले "यास्तव तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रातील लोकास शिष्य करा; त्यास पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नामाने बाप्तिस्मा द्या. जे सर्व काही मी तुम्हास आज्ञापिले ते पाळावयास त्यास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सदोदित तुम्हाबरोबर आहे" (मत्तय २८: १९;२०). तो त्यांना म्हणाला, "सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा; जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरत नाही तो दंडास योग्य ठरेल" (मार्क १६:१५-१६). त्यानंतर

पौलाने तरूण सुवार्तिक तिमथी याला उपदेश केला की, "वचनाची घोषणा कर, सुवेळी, अवेळी तयार राहा. सर्व प्रकारच्या सहनशिलतेने व शिक्षणाने दोष दाखीव. वाग्दंड कर व बोध कर"(२ तिम.४:२). याबरोबर दुसऱ्या वचनांचा उल्लेख करता येईल पण ही सर्व वचने मूलत: शुभ वर्तमान शिकविण्याच्या बाबतीत प्रभूची इच्छा दर्शवितात. प्रेषितांच्या काळात मंडळीने काय केले? प्रभूने जे सांगितले ते सभासदांनी केले. त्यांनी प्रभूच्या वचनाची घोषणा केली. प्रेषितांच्या कार्यांनी प्रेषितांची कृत्ये हे पुस्तक भरलेले आहे. सुवार्तिक सर्व प्रसंगी वादविवाद, चर्चा याद्वारे शिकविण्यात तत्पर असत. प्रेषितांची कृत्ये २, ८, ९, १० व १६ अध्याय वाचा. शिकविण्याचे व शुभवर्तमान गाजविण्याचे काम कोणी केले? यरुशलेमामध्ये प्रभूच्या लोकांचा जेव्हा छळ झाला, त्याचा इतिहास प्रेषित ८:४ मध्ये वाचावयास मिळतो. "तव्हा ते पांगून गेले, ते वचनाची सुवार्ता सांगत चहूकडे फिरले."

त्यांनी कोणते शुभवर्तमान गाजविले? पुन्हा "प्रेषितांची कृत्ये" या पुस्तकाचा अभ्यास केल्यास ते आढळून येईल. संक्षिप्त सांगावयाचे झाल्यास, त्यांनी ख्रिस्ताचे देवपण लोकांस शिकविले; तारण होण्यासाठी काय करावे? ख्रिस्ती मंडळीचे महत्त्व, उपासनेची रित आणि ख्रिस्ती जीवनाचे महत्त्व इ. पौलाने सारांश रूपाने सांगितले की, "कारण ज्यांचा नाश होत आहे त्यास वधस्तंभाविषयीचे शिक्षण मूर्खपण आहे; तरी ज्यास तारण प्राप्त होत आहे अशा आपणास ते देवाचे सामर्थ्य आहे" (१ करिंथ १:१८).

देवाने त्याचे वचन गाजविल्या जावे या त्याच्या आज्ञेप्रमाणे पौल म्हणतो,की देवाचे वचन श्रवण केल्याने विश्वास निर्माण होतो (रोम १०:१७) ख्रिस्त म्हणाला,"आणि सत्य तुम्हास समजेल आणि सत्य तुम्हास स्वतंत्र करील"(योहान ८:३२), पुन्हा तो म्हणाला,"तर ज्याच्यावर त्यांनी विश्वास ठेवला नाही, त्याचा धावा ते कसा करतील? ज्याचे त्यांनी ऐकले नाही त्याच्यावर ते विश्वास कसा ठेवतील? घोषणा करणाऱ्यावाचून ते कसे ऐकतील?"(रोम १०:१४). याचा अर्थ हा की, मनुष्य देवापासून दूर गेला आहे (रोम ३:२३; रोम ६:२३).देवाची प्रीती घोषित केलीच पाहिजे (रोम

५:८). त्या प्रीतीमुळेच मनुष्यास पापापासून मुक्ती देणारा लाभला आहे (योहान ३:१६) त्याचे आज्ञापालन करण्यामुळे मनुष्यास अनंतकालिक जीवन प्राप्त व्हावे व पापापासून मुक्त व्हावे (रोम १:१६-१७, मार्क १६:१५-१६) देवाच्या इच्छेविषयी जे अनभिज्ञ आहेत व जे त्याचे ऐकत नाहीत, ते त्याला पारखे होतील (२ थेस्स १:७-९). यास्तव देवाच्या वचनाची घोषणा करण्यात आलीच पाहिजे.

**२) दरिद्रीजनास मदत करणे.**

देवाच्या वचनात असे दाखले आहे की, जे गरजवंत होते, त्यांच्याबद्दल मंडळीला कळकळ वाटत होती आणि त्यांच्याजवळ जे होते ते वाटून देत असत. प्रेषित २:४५ मध्ये लिहिले आहे, "ते (मंडळीतील लोक) आपापली जमीन व मालमत्ता विकून जसजशी प्रत्येकाला गरज लागत असे, तसतसे सर्वास वाटून देत असत." प्रेषित २:४५ मध्ये लिहिले अर्थात ते स्वयंस्फूर्तीने करीत असत. पुन्हा प्रेषित ६ मध्ये आपण वाचतो की हेल्लेनी यहुद्यानी इब्री लोकांसंबंधाने कुरकुर केली. कारण रोजच्या वाटणीत त्यांच्या विधवांची उपेक्षा होत असे तेव्हा बारा जणांनी शिष्यगणाला एकत्र बोलावून, त्याच्यामधून पवित्र आत्म्याने व ज्ञानाने पूर्ण अशी सात प्रतिष्ठित मनुष्ये शोधून काढा. त्यास आम्ही या (पंक्तिसेवा करणे) कामावर नेमू असे सुचविले.

पौल यरूशलेमातील पवित्र जणांतील गोरगरीबास मदत करण्यासाठी जातो. तो म्हणाते, "सध्या तर मी पवित्र जणांच्या सेवेतच यरूशलेमास जातो. कारण यरूशलेमातील पवित्र जणातल्या गोरगरिबांसाठी, मासेदोनिया व अखया यांनी वर्गणी करण्याची मेहेरबानी केली आहे" (रोम १५:२५-२६). म्हणून पौल करिंथ येथील बंधुजनांस लिहितो, "आता पवित्र जणासाठी जी वर्गणी, तिजविषयी, मी गलतीयातील मंडळ्यास आज्ञा दिल्यामुळे तुम्हीही करा. आठवड्याच्या पहिल्या दिवशी तुम्ही प्रत्येकाने जसे आपणास यश मिळाले असेल त्याप्रमाणे आपणाजवळ द्रव्य जमा करून ठेवावे. यासाठी की मी येईन तेव्हा वर्गण्या होवू नयेत" (१ करिंथ १६:१-२).

**मदत कुणाला करण्यात यावी ?** स्वाभाविकत: मंडळीतील गरजवंतांना प्रथम मदत देण्यात यावी. गरीब, वृद्ध, विधवा, आत्यंतिक गरजेच्या प्रसंगी, पवित्र जणांचे अनाथ इ. मदतीचा वाटा मिळावा. गलती ६:१० मध्ये आपण वाचतो "तर मग आपणाला प्रसंग आहे त्याप्रमाणे आपण सर्वांचे विशेषत: विश्वासबंधूंचे बरे करावे."

ह्यातही प्रत्येकासच मदत करावी असेही नाही. १ ले तीम-५ व्या अध्यायात नमूद केले आहे की; जो व्यक्ती आपला उदरनिर्वाह करू शकत नाही, ज्याला मदत देणारे आप्त नाहीत व तो विश्वासूजन म्हणून सिद्ध होतो, अशा बंधूला मदत करावी. केवळ मागणाऱ्याला न देता, प्रभूच्या पैशाचा काटेकोरपणे विनियोग व्हावा.

त्याचप्रमाणे मंडळीची ऐपत आहे तर मंडळीच्या सभासदांनाच मदत न देता ती अत्यंत निकड असलेल्यांना वर्गणीमधून मदत देण्यात यावी. यासाठी याकोब १:२७ व २रा अध्याय अधिक स्पष्टीकरणासाठी वाचणे आवश्यक आहे याचा अर्थ असा की प्रभूचे शुभवर्तमान घेऊन लोकांपर्यंत पोहचणे होय. अशा प्रकारच्या कार्यासाठी पैसा कोठून उभा करावा? वर्गणी देण्यासाठी उत्सुक असणाऱ्या बंधूकडून या कार्यासाठी पैसा जमा होतो. (१ करिंथ १६:१-२;२ करिंथ ९:६-७) जर मंडळी या कार्यात तत्पर व उदार नसली तर मंडळीतील विश्वासू गरजवंतांना मदत देणे दुरापास्त होईल.

**३) मंडळीला बोध करणे.**

मंडळीला बोध करणे म्हणजे, तिची रचना करणे, ती समर्थ बनविणे, उत्तेजन देणे आणि आध्यात्मिक दृष्ट्यासभासद पवित्र-जणांना मदत करणे होय. या प्रक्रियेतील महत्त्वाचे घटक कोणते? देवाचे कवच, समाधान, उपासनेची वृत्ती, आवड, ऐक दुसऱ्यास मदत करणे, सत्कृत्ये, प्रीती इ. संबंधी प्रेषित ९:३१, रोम १४:११ १ करिं. ८:१, १ थेस्स ५:११, १ करिं १४:२६;२ करिं. १२:१९ व इफिस ४:१२ या वचनामध्ये मंडळीला बोध करण्याच्या प्रक्रियेमधील अपेक्षित बाबी वाचावयास मिळतात. (अवश्य वाचा)

सारांश असा की, सर्वदूर कार्यरत, संघटना, मुख्य कारभारी नसलेली मंडळी आणि विशेष जमा निधी शिवाय, वर्गणी उपलब्ध नसताना ख्रिस्ती वरील बाबी कशी करू शकेल यांचे काही लोकांना नवल वाटेल पण प्रभूचा मार्ग उत्तम मार्ग होय. तो अगाध कार्य करतो. जर आपण प्रभूच्या इच्छेला समर्पित होतो आणि आमच्या जीवनाचा हेतू समजतो, तर मान, सन्मान व गौरव आपल्या प्रभूचे होते. ख्रिस्त मंडळीचा मस्तक आहे आणि ख्रिस्ती समुदाय व समुदायातील व्यक्ती यांना आपले कर्तव्य पूर्ण करावयाचे आहे. हे सर्व शक्य होण्यासाठी मंडळी व मंडळीतील प्रत्येक घटक आपली उदार वर्गणी देवून सर्व काही करू शकतात.

शुभवर्तमान प्रसार, गरजवंतांना मदत व मंडळीला बोध करणे याकडून मनुष्यांचे आत्मे तरले जाण्याचा महान हेतू सफल होतो आणि शेवटी प्रभूचे गौरव होते. याशिवाय मंडळीचे कार्य नसावे. राजकारण, व्यापार निष्क्रीय, मर्त्य मंडळी केवळ एक सामाजिक संघटना, या नात्याने देवाच्या वचनानुरूप नाही. प्रभूची मंडळी या जगात एक आध्यात्मिक मंडळी आहे. ती या जगाची नाही. तिच्याद्वारे देवाच्या वचनाचे आज्ञापालन, मनुष्याची सेवा, शुद्धता व पवित्रता यांनी युक्त अशी पवित्र जणास तारण व आपल्या उत्पन्न कर्त्याला महिमा देणारी आहे. तीच प्रभूची पवित्र मंडळी होय. हाच तिचा उपयोग व हेच तिचे कार्य.

• • •

# अध्याय - १०
# मंडळीचे ऐक्य

**आ**जचे धार्मिक युग ख्रिस्ती मंडळीच्या ऐक्यासंबंधी पूर्वीपेक्षा अधिक सतर्क बनलेले आहे. 'मनुष्याच्या कल्पकतेला संकुचित वृत्तीने सर्वत्र ग्रासले आहे याचे कारण असे की, जगात धर्म-भेद बोकाळले आहेत आणि सर्वांनाच त्याचा वीट आलेला आहे. तरी सुद्धा धार्मिक गटामध्ये मतैक्य नांदू शकत नाही. मिलाफ होण्यासाठी वाव जरी असला तरी धर्मभेद अस्तित्वात आहेतच याला उत्तर ते कोणते?

या प्रश्नाचे उत्तर पवित्र शास्त्रातच आहे. खरे ऐक्य स्थापित करण्यासाठी मनुष्यांनी आपली शिकवण, सिद्धांत, मंडळ्या धर्मविषयक मते इ. चा त्याग करून पवित्र शास्त्र हातात घेऊन, त्याचे वाचन, अध्ययन करावे. त्यावर विश्वास ठेवून त्याचे अनुसरण करावे. नंतर योहान १७ मध्ये प्रभूने जी प्रार्थना केली ते खरे, असली ऐक्य स्थापित होईल. मनुष्यांनी त्याप्रमाणे केल्यास एकाच बाबीवर ते विश्वास ठेवतील. एकाच शिकवणीचा अवलंब करतील. एकच नाव धारण करतील. एकसाथ काम करतील, समान शिकवण देतील व सोबतच स्वर्गात जातील. माणसांच्या मागे जाणे सोडून ख्रिस्ताचा स्वीकार करतील तर ऐक्य या पृथ्वीतलावर आणणे सहज सुलभ होईल.

पवित्र शास्त्र भेद, फुटीचा निषेध करते. पवित्रशात्र सांगते "देव भेदाचे, फुटीचे बी पेरणाऱ्याचा व बंधुजनामध्ये भेदभाव निर्माण करणाऱ्याचा द्वेष करतो.

१ करिंथच्या १ ल्या अध्यायात, फूट पडत असलेल्या मंडळीसंबंधी लिहिलेले आहे. अशा बाबींची प्रशंसा न करता, मूळ नाशाचे कारण नष्ट करण्याची त्वरीत कार्यवाही करतो. त्याने अशी सुरूवात केली; "बंधुजनहो आपला प्रभू येशू ख्रिस्त याच्या नामाने मी तुम्हास विनंती करतो की, तुम्ही

सर्वांनी सारखेच बोलावे म्हणजे तुम्हात फुटी होऊ नयेत. तुम्ही एकचित्ताने व एकमताने यथास्थित व्हावे" (१ करिं.१:१०). त्यांच्या कृतिमधील मूर्खपणा दाखविण्यासाठी त्याने तीन प्रश्न विचारले. ते खालीप्रमाणे-

१. ख्रिस्त विभागलेला आहे काय?

२. पौलाने तुम्हासाठी वधस्तंभावरील मरण सोसले काय?

३. पौलाच्या नामात तुमचा बाप्तिस्मा झालेला आहे काय?

या तीनही प्रश्नानी ते निरूत्तरीत झाले. यास्तव, त्यांच्यामध्ये असलेल्या फुटीसंबंधी त्यांचा असंमजसपणा स्पष्ट केला.

बंधुजणांना पौलाने लिहिले, "आता बंधुजनहो मी तुम्हास विनंती करितो की, तुम्हाला जे शिक्षण मिळाले आहे त्या विरुद्ध जे फुटी व अडथळे आणणारे त्याजवर लक्ष ठेवा आणि त्याजपासून दूर असा. कारण तसले लोक आपल्या प्रभू ख्रिस्ताची सेवा करीत नाहीत तर आपल्या पोटाची करतात; आणि गोड व लाघवी भाषणाने भोळ्यांच्या अंत:करणास भुलवितात" (रोम १६:१७-१८).

कलस्सै १:२०-२२ मध्ये तो म्हणतो, "ख्रिस्ताच्या वधस्तंभावरील रक्ताच्याद्वारे त्याचा स्वत:बरोबर समेट केला व या जगाच्या दुष्कर्मापासून मुक्त केले"

पवित्र शास्त्राची शिकवण झुगारून देवून मनुष्याची शिकवण, त्यांचे नियमशास्त्र, मनुष्यांना अवाजवी महत्त्व देणे आणि नको त्या पुस्तकांचा पवित्र ग्रंथ म्हणून स्वीकार करणे, ह्या मनुष्यांमध्ये फूट पाडणाऱ्या बाबी आहेत. ख्रिस्ताचे अनुसरण केल्याने ऐक्य निर्माण होवून त्याचे फळे चाखल्या जावू शकतात. योहान १७:२०-२१ मध्ये ख्रिस्ताने प्रार्थना केली. "मी त्यांच्यासाठी केवळ नाही, तर त्यांच्या वचनावरून जे मजवर विश्वास ठेवतात, त्यांच्यासाठीही विनंती करतो, यासाठी की त्या सर्वांनी एक व्हावे; हे पित्या जसा तू मजमध्ये व मी तुजमध्ये तसे त्यानीही आम्हामध्ये व्हावे; यासाठी की तू मला पाठविले, असा विश्वास जगाने धरावा." जे

आवाक्याबाहेरचे होते, अशक्य होते त्यासाठी ख्रिस्ताने प्रार्थना केली काय? खचितच नाही. ख्रिस्ती मंडळीमध्ये ऐक्य नांदू शकते पण हे केंव्हा शक्य आहे? ख्रिस्ताने आज्ञापिल्यानुसार त्याच्या अनुसरणानेच ऐक्य नांदू शकेल. मनुष्यांच्या शिकवणीद्वारे फूट पडते व ख्रिस्ताची शिकवण आम्हाला एकत्र बांधते, आणते.

इफिस ४:१-६ वचनात मंडळीमध्ये अपेक्षित ऐक्याचा आदर्श पाहावयास मिळतो. त्याकडे आपण वळू. "यास्तव जो मी प्रभूमध्ये बंदिवान तो मी, तुम्हास विनवितो की तुम्हास झालेल्या पाचारणास शोभेल असे तुम्ही चालावे; पूर्ण नम्रतेने, सौम्यतेने व क्षमाशीलतेने वागून एकमेकांचे प्रीतीने सहन करावे; शांतीच्या बंधनाने आत्म्याचे ऐक्य राखावयास झटत असावे; तुमच्या पाचारणाची जशी आशा एक, त्याप्रमाणेच शरीर एक व आत्मा एक आहे. एक प्रभू, एक विश्वास, एक बाप्तिस्मा, एक देव सर्वांचा पिता, तो सर्वांवर असून सर्वव्यापी व सर्वांमध्ये आहे."

यामध्ये पौलाने ऐक्यासाठी आग्रह धरलेला आहे. यापैकी वर नमूद केलेल्या बाबींमध्ये मंडळीचे ऐक्य प्रामुख्याने नमूद केलेले आहे.

तो म्हणाला, यामध्ये मंडळीचे ऐक्य निदर्शनास येते, जेव्हा येशू १६:१८ मध्ये म्हणाला, "मी या खडकावर माझी मंडळी रचीन. ही एक मंडळी म्हणजे ऐक्य असलेली मंडळी जे आध्यात्मिक शरीर आहे. (१ करिं. १२:२७) आणि त्या मंडळीचा तो (ख्रिस्त) मस्तक आहे (कलस्सै १:१८) . मंडळीची सुद्धा दोन स्वरूपे, १ देवाचे घर किंवा देवाचा परिवार म्हणून चित्रीत केलेली आहेत. (१ ले तीम. ३:१५) परंतु मंडळी म्हणून किती घरे किंवा कुटुंबे ? अर्थात योहान ३:३-५ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे ख्रिस्ताचे राज्य किंवा देवाचे राज्य, ज्याचा ख्रिस्त राजा आहे. कलस्सै ४:११, १ तिम ६:१५ यानुसार प्रभूची किती राज्ये आहेत आणि राजे किती? यांचे उत्तर हेच आहे की एकच राजा व एकच राज्य. हेच मंडळीतील ऐक्याचे गमक होय.

याप्रमाणे पुढील अभ्यास करता, पवित्रशास्त्र भौगोलिक वादाचा निषेध करते. ही भौगोलिकता म्हणजेच मंडळीतील फूट होय. याउलट

शास्त्र, एकता, पूर्णता व एकरूपता या सत्याला चित्रित करते. मंडळी ही वहिवाट आणि विश्वासरहित धार्मिक लोकांची बनलेली म्हणून पवित्रशास्त्र तिचे चित्र उभे करीत नाही. परंतु ज्यांनी ख्रिस्ताचे शिष्यत्व पत्करले आणि त्याच्या शिकवणीचे आज्ञापालन केले, अशा तारण पावलेल्या व पाचारण करण्यात आलेल्या विश्वासणाऱ्यांनी बनलेली ख्रिस्ताची मंडळी असे चित्र पवित्रशास्त्र आपणासमोर उभे करते.

ख्रिस्त हा फूट पडलेला नाही आणि त्यांची मंडळी विभागलेली किंवा फूट पडलेली नाही. फूट पडलेले असणे किंवा फूट पाडणे हे ख्रिस्ताच्या विरोधात बंड पुकारणे होय. मंडळीमधील फुटी नष्ट होऊन त्यामध्ये ऐक्य असावे यासाठीच त्याने प्रार्थना केलेली आहे.

• • •

# अध्याय - ११
# मंडळीचा मतांगिकार

इंग्रजीमधील Creed (मतांगिकार) शब्दमूळ लॅटीन Credo या शब्दापासून तयार झालेला आहे. ज्याचा अर्थ श्रद्धा, धार्मिक विश्वासाचे अधिकारयुक्त मतांचे निवेदन, असा आहे. धर्मश्रद्धेच्या कबुलीची पद्धती, संक्षिप्त तत्त्व किंवा मतांचे प्रतिपादन किंवा निश्चित मताला संबंधित असलेले सूत्र.

जेव्हा मतांगिकार या शब्दाचा विचार करण्यात येतो तेव्हा "प्रेषितांचा मतांगिकार" आणि "सूक्ष्म दृष्टीचे मत" मनात येते. या दोन्हीचा उल्लेख पवित्र शास्त्रात आढळत नाही. याशिवाय मनुष्य निर्मित प्रत्येक मंडळीमध्ये मनुष्याने स्वत: बनविलेला नियम शिस्त, श्रद्धेची कबुली युक्त देवाच्या वचनाला चिकटविलेला मतांगिकार, प्रचलित असल्याचे दिसते.

असे सूचित करावेसे वाटते की, पवित्र शास्त्रापेक्षा अधिक तपशील असलेले कोणत्याही मतांगिकारचे पुस्तक म्हणजे अवास्तव स्वरूपात असलेला मतांगिकार होय. उलट पवित्र शास्त्रापेक्षा कमी मजकूर असलेला मतांगिकार, त्याचे पूर्ण रूप नव्हे. कोणतेही मतांगिकाराचे पुस्तकामध्ये, काही नसते.

प्रकटी २२:१८,१९ आणि गलती १:६-९ ही वचने स्पष्ट रितीने सांगतात की, देवाचा वचनात आपण काही भर घालू नये; त्यातून काही काढून टाकू नये आणि त्याचा विपरित अर्थ करू नये. (अन्यथा देव आपणावर पीडा आणील) दुसऱ्या शब्दात सांगता येईल की देवाचे शास्त्र परिपूर्ण आहे. (२ तिम ३:१६-१७) (याको १:२५) आपण देवाचे वचने बोलत आहोत, असे बोलावयाचे आहे (१ पेत्र ४:११) म्हणून पवित्र शास्त्रातील देवाच्या वचनात भर घालण्याची काही आवश्यकता नाही.

आज जगात जी फूट आपणास दिसते, ही देवाच्या वचनामुळे

नसून, मनुष्यांनी, मनुष्यांची शिकवण/मतांगिकार स्वीकारला आहे. हे त्याचे मूळ कारण आहे. प्रत्येक मंडळीला आपली स्वत:ची नियमावली असावी, याबाबत वितंडवाद चालू आहे. याद्वारे पवित्र शास्त्राकडे दुर्लक्ष, ही त्यातील मूक कबुली होय. ही किती दु:खद बाब होय. कळकळीची विनंती अशी आहे की आपण मनुष्यानी केलेली पुस्तके वा मते बाजूला सारून पवित्र शास्त्रावर आधारित आमची कृती व श्रद्धा असावी. कारण ते देवाचे पवित्र वचन आहे, ते आम्हामध्ये फूट न पाडता ख्रिस्तामध्ये आम्हास एकत्र करील.

प्रभूच्या मंडळीचा मतांगिकार कोणता आहे? येशू ख्रिस्ताशिवाय आम्हास अन्य कोणी मुक्ती देणारा नाही आणि देवाच्या पवित्र वचनाशिवाय अन्य दुसरा मतांगिकार नाही.

धर्माच्या बाबतीत आमची मते व कल्पना कुचकामी आहेत. पवित्र शात्रातील वचनाचा आमच्या मानवी बुद्धीने विचार करू नये. पवित्र शास्त्र आमच्यासाठी उत्तम मार्गदर्शक व सर्वकाही असावे. आम्ही त्यामधील शिकवण व सत्य आचरिले आहे आणि अन्य विश्वासणाऱ्यांनात्याद्वारे मार्गदर्शन करतो. योहान ५:३९ २ तीम. २:१५ या वचनाचा मनापासून अभ्यास करावा. त्यानुसार त्यामधील शिकवण आचरणात आणावी हाच प्रामाणिक सल्ला सर्वांसाठी आहे.

पवित्रशास्त्रासमान दुसरा ग्रंथ लिहिण्यासाठी कोणलाही देवाने सुपूर्द केले नाही. यावर आम्ही दृढ आहोत आणि तसेच पवित्रशास्त्रासारखेच जीवनी वचन, लिहिण्यासाठी पवित्र आत्म्याने कोणलाही प्रेरित केले नाही. ज्या देवाच्या वचनाद्वारे आमचे तारण व्हावे ते देवाचे, केवळ देवाचेच, त्याच्या प्रेरणेने लिहिल्या गेलेले, जिवंत वचन आहे. शिवाय हेच देवाचे वचन शेवटच्या दिवसात आमचा न्याय करील. (योहान १२:४८) या आणि इतर कारणांमुळे आमच्या आध्यात्मिकतेच्या पूर्तीसाठी व दुसऱ्यांच्या उत्तेजनासाठी या वचनाचा आम्ही स्वीकार करतो.

देवाचे वचन सत्य आहे व ते सत्य जाणून घेण्यासाठी आम्ही

पवित्रशास्त्राचा अभ्यास करतो (योहान ९:३२; १७:१७) सत्याच्या उगमाकडे गेल्याशिवाय सत्य आम्हास समजू शकत नाही. म्हणून सत्यावर विश्वास ठेवण्यासाठी सत्य, आम्ही श्रवण व ग्रहण केलेच पाहिजे (रोम १०:१७). धार्मिक बाबतीत आमची फसवणूक होते यात आश्चर्य नाही. तसेच धार्मिक क्षेत्रात फूट व गोंधळ आहे हेही आश्चर्य नसावे. परमेश्वराशिवाय साह्यासाठी आम्ही मनुष्यावर अवलंबून राहतो. पवित्र शास्त्रांतील शिकवणीकडे दुर्लक्ष करून मनुष्यांच्या शिकवणी व मतांगिकाराची कास आम्ही धरली आहे. यास्तव तारण पावण्यासाठी आम्ही प्रभूच्या वचनाकडे लक्ष देणे अत्यावश्यक आहे.

ख्रिस्ती मंडळीचे सत्य समजण्यासाठी मनुष्यांना आम्ही पवित्रशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी उत्तेजित करावे. जगात ढोंगी मंडळ्या आहेत. कोणती मंडळी शुद्ध, खरी आहे? त्या प्रत्येक मंडळीचा अभ्यास करावा काय? नाही. मंडळीविषयी सत्य प्रकट करणाऱ्या पुस्तकांचा अभ्यास करणे इष्ट आहे. प्रभूच्या मंडळीचे सत्य समजल्यावर पवित्र शास्त्रांतील शिकवणीप्रमाणे कृती करणारी मंडळी ओळखण्यासाठी, आम्हास कोणतीही समस्या राहणार नाही.

आत्म्याला-तारण प्राप्तीसाठी हे समजावे म्हणून पवित्र शास्त्राचा अभ्यास करण्यास, मनुष्यास आपण उत्तेजन द्यावे. मनुष्याच्या शिकवणी व सिद्धांतानुसार मुक्ती, तारण पावण्यासाठी अनेक मार्ग सांगितलेले आहेत परंतु पवित्रशास्त्र वचनानुसार सत्याचे श्रवण करणे, त्यावर विश्वास ठेवणे, पापाबद्दल पश्चात्ताप करणे, ख्रिस्ताला कबूल करणे व त्याच्या पवित्र नामात बाप्तिस्मा घेण्याकडून पापापासून मुक्ती मिळते. (मार्क १६:१५-१६, प्रेषित २:३८). प्रभूच्या वचनात व मनुष्यांच्या सांगण्यात फरक तो कोणता? तारण करणारा देव एकच आहे. यास्तव पापापासून मुक्ती होण्यासाठी प्रत्येकाने देवाचे वचन श्रवण केलेच पाहिजे.

जिवंत देवाची उपासना कशी करावी, यासाठी पवित्र वचन आम्हास शिकविते, यासाठी आपण उत्तेजन द्यावे. उलटपक्षी उपासनेचे अनेक मार्ग

नसून शास्त्र आम्हास शिकविते की, "भक्तीचा केवळ एकच मार्ग आहे आणि कसा अनन्य साधारण आहे" (योहान ४:२४).

तारण, जीवन आणि ईश्वर भक्तीशी संबंधित या आणि सर्व बाबतीत, तारणाचे सत्य समजण्यासाठी एकालाच नाही पण सर्वास आपण शास्त्राचा अभ्यास करण्यास आग्रह धरावा. पवित्र शास्त्राचा उलगडा होत नाही आणि निश्चित प्रकारे त्यामधील वचनाचे आकलन होत नाही असा समज भ्रामक आहे. आत्म्याचा नाश व्हावा म्हणून सैतान मनुष्यास पवित्रशास्त्राच्या सत्यापासून दूर नेतो. परंतु तारण प्राप्तीसाठी त्याने पवित्रशास्त्र वचनावर विश्वास ठेवून धार्मिक बाबीसाठी ते एकमेव मार्गदर्शक, वाटाड्या बनते त्याद्वारेच त्याचे तारण होते व देवाशी त्याचे नाते जुळते.

आपला मतांगिकार कोणता? ख्रिस्त आणि त्याचे पवित्र वचन हाच आपला मतांगिकार होय. त्याशिवाय अन्य म्हणजे भ्रामकता. ख्रिस्त हा देवाचा पुत्र व त्याचे वचन आमचे सर्वस्व आहे हा आमचा दृढ विश्वास आहे. आम्ही त्याचा स्वीकार करून त्याचे अनुसण करीतो आणि सर्वांनी तेच करावे. मनुष्याचा मतांगिकार हा आम्हाला अधोलोकांच्या वाटेने नेतो. येशू म्हणाला, "मी मार्ग, सत्य व जीवन आहे माझ्याद्वारे आल्यावाचून कोणीही पित्याजवळ जात नाही" (योहा १४:६).

• • •

# अध्याय - १२
# मंडळीचा इतिहास

**प्रे**षित अध्याय २ मध्ये मंडळीची स्थापना किंवा तिच्या राज्याचा प्रारंभ दर्शविला आहे. पवित्रजन यरूशलेमात पेन्टेकॉस्टच्या दिवसासाठी एकत्र जमले असता, पवित्र आत्म्याचा वर्षाव त्यांच्यावर होत असता, अनेक राष्ट्रांच्या सक्षमतेमध्ये पेत्र आणि प्रेषितांनी जाहीर केले की, योएल संदेष्ट्याच्याद्वारे वर्तविण्यात आलेल्या भविष्यवाणीची पूर्णता झाली की, ख्रिस्त आम्हांसाठी मृत्यू पावला आहे आणि शेवटचे दिवसांची सुरूवात झाली. सुमारे ३००० लोकांनी पश्चात्ताप व पापापासून मुक्तीची घोषणा ऐकली व त्यांनी येशूच्या नामात बाप्तिस्मा घेतला आणि प्रभूने मंडळीमध्ये त्यांची भर घातली आणि यरूशलेमपासून सुवार्ता पसरून यहुदिया, समरिया आणि पृथ्वीच्या शेवटापर्यत शुभवार्ता पसरली आणि आकाशाखाली सर्वांनी सुवार्ता ऐकली (प्रेषि.१:८, मत्तय २८,१९-२०, मार्क १६:१५-१६, कलस्सै १:२३).

प्रेषितांच्या काळांत मंडळीची भरभराट झाली. वेगाने तिचा प्रसार झाला. पौलाने, परिवर्तनानंतर तीन सेवेसाठी फेऱ्या केल्या. त्याने यहुद्या बरोबर विदेश्यांना देखील शुभवर्तमान गाजविले. आशिया आणि युरोपच्या भागांत स्थापन झालेल्या मंडळीमध्ये अनेक लोक व लोकसमुदाय प्रभूकडे वळले. हे कार्य सोपे नसून पौलाला त्यांसाठी छळ सोसावा लागला. प्रथम यरूशलेमातील मंडळीचा छळ करण्यात आला. या छळामुळे शिष्य इतस्ततः पांगले व त्यांनी सर्वत्र शुभवर्तमान गाजविले (प्रेषि ८:१-४). त्याकाळी रोमी लोकांनी त्यांच्यावर ओढवलेल्या संकटामुळे ख्रिस्ती बांधवास दोषी ठरविले आणि रोम येथे व रोमच्या राज्यामध्ये समरांगणावर त्यांचा छळ करण्यात आनंद मानला. पौलास बन्दिवान करून त्याला चौकशीसाठी त्यांस रोम येथे नेण्यात आले. इतिहास सांगतो की, योहानाला सोडून ख्रिस्तासाठी सर्व

प्रेषित रक्तसाक्षी बनले. शेकडो, हजारो कदाचित लाखो ख्रिस्ती जणांना आपले प्राणही गमवावे लागले.

छळ होत असतांना मंडळीची वाढ झाली व तिचा प्रसार झाला. छळवणूकीमुळे मंडळीला तेवढी हानी झाली नाही. परंतु आपसातील तंट्यामुळे मंडळीचा ऱ्हास झाला. मंडळीची पिछेहाट होईल याबद्दल पौलाने भविष्य वर्तविले. त्याच्या भविष्यवाणीचा अर्थ असा की, असा दिवस येईल की प्रभूच्या मंडळीचे सभासद भ्रांतीत पडतील.

पण तो म्हणतो त्याकडे आपण लक्ष देवू या.

२ थेस्सलनी २:१-१२ मध्ये तो म्हणतो "बंधुजनहो आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचे आगमन व त्याच्याजवळ आपले एकत्र होणे या संबंधाने आम्ही तुम्हास अशी विनंती करतो की तुम्ही एकाएकी दचकून चित्तस्थैर्य सोडू नका; प्रभूचा दिवस येवून ठेपला आहे, असे सांगणाऱ्या आत्म्याने किंवा जणू काय आम्हाकडून आलेल्या वचनाने अगर पत्राने घाबरू नका; कोणत्याही प्रकारे कोणाकडून फसू नका; त्या दिवसाच्या अगोदर धर्मात्याग होवून, पापपुरुष प्रकट होईल; तो नाशपुत्र विरोधी व ज्याला देव किंवा भजनीय म्हणून म्हणतात त्यासर्वांपेक्षा स्वत:ला उंच करणारा म्हणजे "मी देव आहे" असे स्वत:चे प्रदर्शन करीत. देवाच्या मंदिरात बसणारा असा आहे, मी तुम्हाजवळ असताना हे तुम्हास सांगिले, याची तुम्हास आठवण नाही काय? त्याने स्वसमयीच प्रकट व्हावे, अन्य वेळी होवू नये. म्हणून जे प्रतिबंधक आहे तुम्हास ठाऊक आहे. अधर्माचे गुज आताच आपले कार्य चालवित आहे आणि जो आता प्रतिबंध करीत आहे तो दूर होईपर्यंत मात्र ते तसेच आपले कार्य चालवीत जाईल आणि मग तो अधर्मी पुरुष प्रकट होईल, त्याला प्रभू येशू आपल्या मुखातील श्वासाने मारून टाकील आणि आपण येताच स्वदर्शनानेच त्याला नाहीसे करील; ज्यांचा नाश होणार त्यांनी आपले तारण साधावे म्हणून सत्यांची आवड धरली नाही; त्यांच्यासाठी सैतानाच्या कृतिप्रमाणे सर्व प्रकारची खोटी महत्कृत्ये, चिन्हे, अद्भूते आणि सर्व प्रकारचे अनितीजनक कपट यांनी युक्त असे त्याचे येणे होईल. त्यांनी

असत्यावर विश्वास ठेवावा एतदर्थ देव त्यांच्या ठायी भ्रांतीचे कार्य चालेल असे करितो, ज्यांनी सत्यावर विश्वास ठेवला नाही, तर अनितीत संतोष मानला, त्या सर्वांस दंडाज्ञा व्हावी म्हणून असे होईल.''

यास्तव पौल म्हणाला की, त्यावेळी ह्या दुष्ट कृतीचे त्यांच्यामध्ये काम करण्यास प्रारंभ झाला होता. तो पुढे म्हणतो, ''आत्मा स्पष्ट म्हणतो की, पुढील काळी विश्वासापासून कितीएक लोक भ्रष्ट होतील, लबाड बोलणाऱ्या लोकांच्या ढोंगामुळे ते फुसलाविणाऱ्या आत्म्यांच्या व भूतांच्या शिक्षणाच्या नादी लागतील; त्या मनुष्यांचा सद्सद्विवेक डागलेला असा होईल; लग्न करावयाला ते मना करतील, आणि विश्वास ठेवणारे व सत्य समजणारे यांनी इशोपकारस्मरण करून ज्याचा उपभोग घ्यावयाचा, अशी देवाने उत्पन्न केलेली भक्षे वर्ज करण्यास सांगतील'' (१ तिम. ४:१-३).

इफिस येथील मंडळीच्या वडिलांशी बोलतांना पौल म्हणाला, ''आता तुम्ही आपणाकडे व ज्या कळपात पवित्र आत्म्याने तुम्हास अध्यक्ष करून ठेविले त्या सर्वांकडे लक्ष द्या, यासाठी की देवाची जी मंडळी त्याने आपल्या रक्ताने मिळविली तिचे पालन तुम्ही करावे. मी गेल्यावर कळपाची दया न करणारे असे क्रूर लांडगे तुम्हामध्ये शिरतील हे मी जाणून आहे; तुम्हापैकी काही माणसे उठून शिष्यास आपल्या मागे ओढण्यासाठी विपरित गोष्टी बोलतील. यास्तव सावध असा आणि मी तीन वर्षे रात्रंदिवस अश्रू गाळीत, प्रत्येकास बोध करणे थांबविले नाही, याची आठवण ठेवा'' (प्रेषित २०:२८-३१).

यास्तव पौलाने त्यांना बजाविले की, मंडळीमधील काही क्रूर लांडगे उठले आणि त्यांनी ख्रिस्ताच्या अनुयायांना आपल्या मागे ओढले. इतिहास सांगतो की, मंडळीच्या अध्यक्षावर हल्ला, चढाई करून पिछेहाट सुरू झाली. देवाची योजना होती की प्रत्येक मंडळीचे स्वत:चे आपले वडील व सेवक स्वतंत्र असावे. तथापि काळाच्या ओघात एका मंडळीने आपले वडील किंवा बिशप यांना दुसऱ्यापेक्षा उंच असल्याचे प्रदर्शन सुरू केले आणि एका बिशपचे अधिपत्य अनेक मंडळावर सुरू झाले. एक बिशप

सर्वांचा बिशप म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. अर्थात हे क्षणात घडलेले नाही. अनेक वर्षाच्या काळानंतर हे घडले. इ.स. ६०६ मध्ये आज आपणास ज्ञात असलेला विश्व बिशप किंवा ह्या नवीन चळवळीचा पोप हा कॅथॉलिक मंडळीचा अध्यक्ष बनला.

ख्रिस्ताच्या मंडळीचे काय झाले ? स्वत:ला प्रकट न करता काही आपल्या विश्वासात स्थिर राहिले. परंतु प्रभूने त्यांना वचन दिले होते की प्रभूचे राज्य-मंडळी-सर्वकाळ टिकेल आणि त्याप्रमाणे ख्रिस्ताची मंडळी अबाधित राहिली.

जोपर्यंत धार्मिक क्षेत्राचा संबंध होता, कॅथॉलिक मंडळीचे वर्चस्व वाढले परिणमा स्वरूप, या क्षेत्रातील कॅथॉलिक मंडळीच्या पुढील अनेक शतकांचा वर्चस्वचा काळ "काळे युग" म्हणून ओळखल्या जाते. शास्त्राची शिकवण काय आहे ते वाचणे व समजणे केवळ विशेष व्यक्ति करू शकतात, ह्यामुळे सर्वसाधारण मनुष्यास नाकारले याप्रमाणे त्यांनी पवित्र शास्त्राचे वाचणे व समजणे त्यांच्यापुरते मर्यादित ठेवले.

याच काळामध्ये कॅथॉलिक मंडळीची, पवित्र जलाचे शिंपडणे व परिपाठीय संगीत या वादावरून रोमन व ग्रीक कॅथॉलिक मंडळी अशी देन शकले पडलीत. जशी वर्षे निघून गेलीत, रोमन कॅथॉलिक मंडळीने आपल्या परिषदेद्वारा दुसरा सिद्धांत व शिकवण यांची व्यवस्थे-घटनेमध्ये भर घातली. शेवटी १५ व्या शतकात कॅथॉलिक मंडळी सिद्धांतिक व नैतिकदृष्ट्या इतकी भ्रष्ट झाली की स्वत: प्रिस्ट असतानाच मार्टिन ल्युथर नामक मनुष्याने मंडळीत बदल घडवून आणण्याचा चंग बांधला.

त्याला बहिष्कृत करण्यात आले आणि त्याच्या मनाला पटलेली तत्त्वे व सिद्धांत खऱ्या अर्थाने शिकविण्यासाठी त्याने कॅथॉलिक मंडळीचा त्याग केला. याचे फलित म्हणून सुधारणावादी आणि कॅथॉलिक मताला असंमत ख्रिस्ती चळवळ उदयास आली. त्यालाच अर्वाचिन युगात प्रादेशिक वाद किंवा भिन्न मंडळ्याचे युग संबोधिले जाते. लुथरचा हा प्रयत्नरूपी प्रकाशझोत जगाच्या कानाकोपऱ्यात चमकला व पवित्र शास्त्रातील देवाच्या

पवित्र वचनाकडे पुन्हा एकदा ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांचे लक्ष वेधले गेले. एवढे होवूनही त्यांना घवघवीत यश प्राप्त झाले नाही.

१७ व १८ व्या शतकात युरोप व अमेरिकेत वर डोकावणाऱ्या प्रादेशिक वादामुळे निर्माण झालेल्या फूट व गोंधळाने त्यांच्या नाकी नऊ आले. हळूहळू काही भ्रामकता ध्यानात आल्यावर पवित्र शास्त्र पूर्णत: त्यांचा मुख्य आधार व केंद्र बनले. नवीन मंडळी सुरू करेण हा त्यांचा मानस नव्हता. परंतु शास्त्रानुसार देवाची एक मंडळी असावी. त्याप्रमाणे "कॅथॉलिक मताशी असंमत असलेली" ख्रिस्ताची एक मंडळी स्थापन करण्यात आली आणि त्या वेळेपासून लाखो लोक मनुष्याच्या शिकवणीचा त्याग करून, खरे ख्रिस्ती व ख्रिस्ताच्या मंडळीचा सभासद होण्यासाठी नवीन करारातील ख्रिस्तित्वासाठी, सर्वत्र प्रबळ इच्छा दर्शविण्यात आलेली आहे आणि पवित्र वचनाद्वारे वचनाची सुवार्ता सांगत, अफ्रिका, भारत, रशिया, पोलंड या आणि इतर दुसऱ्या अनेक ठिकाणी मंडळी अस्तित्वात आलेली होती. त्याच स्वरूपाची मंडळी आज अस्तित्वात असलेली आढळते. फार पूर्वीपासून पवित्र शास्त्रातील मंडळी एक आहे याचा अदमास घेण्यासाठी आवश्यकता नाही. मंडळीचा नमुना पवित्र शास्त्रानुसार आहे आणि आपण त्याचे अनुसरण करतो, तर आपण प्रभुच्या मंडळीचे लोक आहोत. "बी हे देवाचे वचन आहे" आणि ख्रिस्ती व ख्रिस्ताच्या मंडळीचे सदस्य जसे प्रेषितांच्या काळात बनत होते, त्याचप्रमाणे आजही निर्माण करते. देवाचे राज्य सदा सर्वकाळ टिकणारे आहे हा आमचा विश्वास आहे म्हणून ते स्थापन झाले तेव्हापासून जगात कोठे तरी अस्तित्वात असलेले, ते सर्वकाळ टिकेल व मनुष्य किंवा सैतानाद्वारे त्याचा नाश होणार नाही. देवाचे राज्य-मंडळी-सुरूवातीपासून अंतापर्यंत विजयी राहून शेवटी प्रभूसोबत वास करील.

• • •

# अध्याय - १३
# सांप्रत काळातील मंडळी

सुमारे दोन हजार वर्षापूर्वी ख्रिस्ताच्या मंडळीची स्थापना झाली. (प्रेषित २) आजचे तिचे स्वरूप तेच आहे. आपण विचाराल "हे कसे शक्य होईल?" नवीन करारात वर्णन केलेली ती मंडळी होय.

फार पूर्वीपासून पेंटेकॉस्टच्या दिवसापासून आजची मंडळी मूळ मंडळी होती की नाही, याचा शोध घ्यावा लागेल असे काही अभ्यासकांचे मत आहे. तथापि हे सत्य नाही. प्रथमत: दानि २:४४, लूक १:३३, इब्री १२:२८ मध्ये सांगितले आहे की प्रभू म्हणतो, "देवाचे राज्य किंवा मंडळीचा अंत होणार नाही, ती युगानुयग टिकेल." याचा स्पष्ट अर्थ असा आहे की प्रारंभापासून आजपावेतो ख्रिस्ताची मंडळी जगात कोठे ना कोठे तरी अस्तित्वात होती, तिची सत्यता सिद्ध होण्यासाठी मंडळी एकाच वेळी सर्व ठिकाणी अस्तित्वात असावी, याची गरज नाही. दुसरे जागी ती देवाच्या राज्याचे बी आहे (लूक ८:११) प्रेषितांच्या काळात तिने ख्रिस्ती लोक निर्माण केले. आजही ते देवाचे वचन बी-समर्थ आहे. त्या प्रेषितीय काळात ख्रिस्ताची मंडळी बनली, आजही ते सत्य कायम आहे. नवीन करारातील शिकवणीनुसार, विश्वासणाऱ्यांनी कृती केल्यास प्रभूची मंडळी पूर्णत: साकार होणे शक्य आहे.

देवाने प्रत्येक युगात लोकांना मार्गदर्शन केले. नोहाला तारू बांधण्यासाठी त्यांने मार्गदर्शन केले (उत्पत्ती ६) मोशेला त्याने "पर्वतावर तुला दाखविलेल्या नमुन्याप्रमाणे सर्व वस्तू बनविण्याची सावधगिरी ठेव" (इब्री ८:५) असा आदेश मंडप उभारण्यासाठी दिला आणि नवीन करारामध्ये देखील ख्रिस्ताच्या मंडळीचा परिपूर्ण नमुना स्पष्ट केला आहे. देवाने दिलेल्या नमुन्याप्रमाणे नोहा व मोशेला अनुसरण करण्यास सांगितले होते, आपण मंडळीच्या नमुन्याचे अनुसरण केलेच पाहिजे. देवाने दिलेल्या आदेशानुसार

नोहा व मोशे यांनी तारू व मंडपाचा नमुना तयार केला आणि देव संतुष्ट झाला, त्याप्रमाणे देवाच्या वचनामध्ये भर न घालता किंवा त्यातून काही न काढता मंडळीचा नमुना कायम ठेवला व कृति केली, तर देव संतुष्ट होईल (प्रकटी २२:१८-१९).

नवीन करारात मंडळीच्या ओळखीची लक्षणे स्पष्ट रितीने दाखविलेली आहेत. मंडळी काय आहे, तिची रचना कोणी केली, तिची स्थापना कोठे झाली होती, ती केव्हा स्थापन झाली होती, ती कोणाच्या नवाने ओळखल्या जात असे, तिच्या सभासदांचे नाव, तिच्या सभासदांची पात्रता कोणती, तिची भक्ती आणि तिचे कार्य याबद्दल प्रभूने सांगितले आहे. तिचा मस्तक कोण,तिची किंमत, तिचा तारणारा इत्यादीचे वर्णन नवीन करारात आहे. तिचे कार्य व ती काय आहे या बाबतीत शंका बाळगण्याचे प्रयोजन नाही. देवाचे वचन जेवढे स्पष्ट आहे, तेवढेच मंडळीच्या नमुन्याची स्पष्टता आहे.

पवित्र शास्त्राच्या अध्ययनाची अत्याधिक गरज आहे अशासाठी की पवित्र शास्त्रातील मंडळी एकच व खरी आहे हे आपण जाणून घ्यावे. मंडळीचे सत्य, जेव्हा आम्ही जाणतो त्याप्रमाणे आचरण करतो, तरच आपण तिचे सभासद बनू आणि याप्रमाणे ख्रिस्ताने स्थापन केलेली मंडळी सिद्ध होईल. बी जसे त्याच्या गुणधर्मानुसार उपज देते. तद्वतच देवाचे वचन, भूतकाळातील मंडळीनुसार ख्रिस्ती लोक व देवाच्या मंडळीचे सभासद निर्माण करील.

जगात ख्रिस्ताची मंडळी आढळेल. ती तेथे व सर्वत्र आहे. पवित्र शास्त्रातील शिकवण आचरणात आणल्यास ती कोठेही कोणत्याही समयी अस्तित्वात येईल. देवाच्या इच्छेप्रमाणे लोक आचरण करणार नाहीत तर तिची वाढ खुंटेल.

पवित्र शास्त्रातील शिकवणीनुसार आचरण होते म्हणून ख्रिस्ताच्या मंडळीचा विकास व विस्तार आज जगात होत आहे. ती फूटी व कलहाचा निषेध करते व ख्रिस्तास उंचावते, गौरव व महिमा देते. याच मंडळीचा वृत्तांत पवित्र शास्त्रात आपण वाचतो. ती एक गट किंवा गटांचा समुदाय,

मेळावा नव्हे. ती कॅथॉलिक मतांशी असंमत असलेली, कॅथॉलिक किंवा गटबाजीची नाही. मग ती काय आहे? ती केवळ ख्रिस्ताच्या रक्ताने विकत घेतलेली मंडळी होय. हेच सत्य आहे.

प्रभूच्या मंडळीचे ऐहिक प्रमुख व्यक्ती किंवा मुख्यालय नाही. आम्ही मनुष्यास महिमा देत नाही. बुद्धीच्या आधारावर तयार केलेली उत्कृष्ट संघटना,आमची नाही. प्रत्येक मंडळी आपल्या स्थानिक वडील,सेवक, सुवार्तिक,शिक्षक व सभासदासह स्वतंत्र आहे.ख्रिस्ताशिवाय आपणास कोणीही मुख्य नसल्यामुळे कोणी एक सभासद दुसऱ्यापेक्षा अधिक मोठा नाही.

ख्रिस्ताच्या मंडळीचे शत्रू होते व आजही तिचे विरोधी आहेत. धार्मिकांचा गट तिचा विरोध करतात. म्हणून त्यांचे न ऐकणाऱ्यांप्रती ते अप्रिती दर्शवितात. ते आपला द्वेष करतात. कारण आपलें सहभागीपण त्यांचे बरोबर नाही आणि आपण देवांबरोबर चालतो. ते माणसाची शिकवण आचरणात आणतात व कोणी तरी पवित्र शास्त्राचे अनुसरण करतात याबाबत त्यांना जाणीव आहे. ते मनुष्यांचे ऐकतात व त्यांनी दिलेली नावे धारण करितात व आपण ख्रिस्ताची आज्ञा पाळून त्याचे नाव धारण करतो याचे त्यांना पूर्ण ज्ञान असते. आपल्याविरुद्ध त्यांची शस्त्रे सत्यावर आधारित नसतात. परंतु आपणास समोर करून लोकांची अंत:करणे ते आपल्याविरुद्ध कलुषित करतात. परंतु त्यांचे श्रम व्यर्थ जातात.

युगानुयुगापासून ख्रिस्ताची मंडळी विजयोन्मुख झालेली आहे. या जगाचे वैरी आणि नरकाचे सर्व वाटेकरी तिचा विकास खंडीत करू शकत नाहीत. तिच्या अवतीभोवती असलेल्या समुदायाच्या तुलनेत मंडळी आकाराने लहान असली तरी ती तारण पावलेली आहे (मत्तय ७:१३-१४). ख्रिस्ताची केवळ एकच मंडळी आहे आणि तिला घेऊन जाण्यासाठी तो एक दिवस पुन्हा येईल (इफिस ५:२७; योहान १४:१-६). तो या राज्याचा अधिपती म्हणून येईल व तिला देवाच्या हवाली सोपून देईल (१ करिं. १५:२४). त्याला एकच नवरी आहे (प्रक. २१:९) व त्याचे नाव धारण केलेल्या नवरीला घेऊन जाण्यासाठी एक दिवस पुन्हा येईल. इतर मंडळ्यांचे काय

होणार? तो त्यांना म्हणेल की तो त्यांना ओळखत नाही. मत्तय १५:१३ मध्ये सांगितल्याप्रमाणे तो त्यांना उपटून काढील आणि न शमणाऱ्या अग्नीमध्ये तो त्यांना टाकील.

नवीन करारातील शुद्ध ख्रिस्त लोक, ही आमची तळमळ आहे. पवित्र शास्त्राचे अध्ययन आम्हास सत्य शिकविल. त्यामधील वचनाप्रमाणे आचरण केल्यास आपणास तारण प्राप्त होईल व पवित्र शास्त्रात वर्णन केलेल्या मंडळीमध्ये आपली भर घालण्यात येईल.

जर तुम्ही ख्रिस्ताच्या मंडळीचे सभासद नाही तर त्या मंडळीचे सभासद बनण्यासाठी आपणास आम्ही उत्तेजन देतो. देवावर विश्वास ठेवा, आपल्या पापाबद्दल पश्चात्ताप करा. ख्रिस्त देवाचा पुत्र म्हणून त्याला कबूल करा आणि तारण मिळावे म्हणून त्याच्या नावात बाप्तिस्मा घ्या (मार्क १६:१६, रोम १०:१०, प्रेषित २:३८). प्रभू आपली मंडळी मध्ये भर घालील व आपण ख्रिस्ताचे व्हाल (प्रेषित. २:४७, प्रेषित ११:२६). आपण हे कराल का? ते करण्यासाठी कोणीही आपणास बळजबरी करणार नाही. आपण पवित्र शास्त्राचे अध्ययन केल्यास, ख्रिस्ती बनण्याची आवश्यकता निश्चित भासेल आणि उर्वरित आयुष्य ख्रिस्तासाठी जगणे व त्याच्या राज्याची वृद्धी करण्यात प्रयत्नशील व्हाल.

• • •

# पाठ -१

"होय किंवा नाही" उत्तरे लिहा.

१. पवित्र शास्त्रात 'मंडळी'चा उल्लेख आहे. ................

२. कॅथॉलिक हा समुदाय म्हणजे ख्रिस्ती मंडळी होय. ................

३. लोकाधिक्य म्हणजे मंडळी होय. ................

४. 'मंडळी' हा शब्द केवळ एकाच अर्थाने वापरला आहे..............

५. ख्रिस्त म्हणाला"मी माझ्या मंडळ्या रचिन" ................

६. आशियातील सात मंडळ्या सात भिन्न पंथीय दाखविल्या आहेत. ................

७. मंडळी ही ख्रिस्ताचे शरीर होय. ................

८. शरीर एक आहे. ................

९. ख्रिस्त मंडळीचे मस्तक आहे. ................

१०. देवाचे राज्य अद्याप यायचे आहे. ................

**योग्य उत्तरे लिहा.**

१. "मंडळी काय नाही" हे दर्शविणाऱ्या बाबी लिहा ..................

..........................................................................

२. "मंडळी" हा शब्द कोणत्या ग्रीक भाषेच्या शब्दापासून तयार झाला?

..........................................................................

३. "मंडळी" कशी तयार होते ? ..............................................

..........................................................................

४. कोणत्या दोन अर्थाने "मंडळी" हा शब्द या पाठात वापरला आहे?

..........................................................................

५. "मी माझी मंडळी बांधीन" असे कोण म्हणाला ? ..................

..........................................................................

६. “त्याने किती मंडळ्या बांधल्या ? ..........................................

..........................................................................................

७. आशियामधील सात मंडळ्या कोणत्या ? ..................................

..........................................................................................

८. शरीरे किती आहेत ? ..............................................................

..........................................................................................

९. राजांचा राजा कोण आहे ? ....................................................

..........................................................................................

१०. प्रभूच्या द्राक्षमळ्यातील आपले काम कोणते ? ........................

..........................................................................................

**थोडक्यात व्याख्या लिहा.**

१. एक्लेसिया : ..........................................................................

..........................................................................................

२. ख्रिस्ताचे शरीर : ..................................................................

..........................................................................................

३. देवाचे गृह : ..........................................................................

..........................................................................................

४. देवाचे राज्य : ......................................................................

..........................................................................................

५. प्रभूचा द्राक्षमळा : ................................................................

..........................................................................................

● ● ●

# पाठ -२

१. प्रथम मंडळी कोठे अस्तित्वात आली ? ..............................................

.......................................................................................

२. देवाने केव्हा मंडळीची निवड केली ? ..............................................

.......................................................................................

३. येणाऱ्या देवाच्या राज्याची भविष्यवाणी कोणत्या तीन संदेष्ट्यांनी केली ?..........................................................................

४. हे राज्य किती काळ टिकेल ? ..............................................

.......................................................................................

५. मंडळीची रचना करण्याचे वचन कोणी दिले ? ..............................

.......................................................................................

६. त्याने कोणाची मंडळी स्थापन करण्याचे वचन दिले ? ..............

.......................................................................................

७. त्याने किती मंडळ्या रचण्याचे सांगितले ? ..............................

.......................................................................................

८. देवाचे राज्य कसे येईल ? ..............................................

.......................................................................................

९. यरूशलेमामध्ये काय विदित केल्या जाईल ? ..............................

.......................................................................................

१०. मंडळीच स्थापनेबाबत आपणास कोठे वाचावयास मिळते ?

.......................................................................................

**कृपया खरे / खोटे लिहा.**

१. मंडळी नियोजित, भविष्यकथित,वचनदत्त आणि नंतर स्थापन केलेली होती. .................

२. मंडळी देवाच्या संकल्पात होती. .................

३. देवाचे राज्य जवळ होते असे योहान म्हणाला. .................

४. देवाचे राज्य सामर्थ्याने येणारे होते. ..............

५. मंडळी यरूशलेमात उदयास येईल. .................

६. त्याच्या नावाने सर्व राष्ट्रास पश्चात्ताप व पापक्षमा विदित करण्यात येईल. .................

७. प्रेषित २ मध्ये मंडळीच्या स्थापनेचे वर्णन आहे. .................

८. ह्या घटना रोमन साम्राज्याच्या राजांच्या कारकिर्दीतील होत्या. .................

९. शेवटच्या काळास सुरूवात झालेली होती ? .................

१०. भविष्यवाणी व दिलेली वचने पूर्ण झाली होती. .................

**कृपया खालील वाक्ये पूर्ण करा.**

१. ..............................त्याने आम्हास निवडले.

२. त्यानंतर असे घडून येईल..........................................................

३. स्वर्गीय देव आपले राज्य स्थापन करील ज्याचा कधीही ............ .............................. होणार नाही.

४. मी .................................. रचिन.

५. ..................................... पासून आरंभ करून पश्चात्ताप व पापक्षमा घोषणा करण्यात यावी.

# पाठ -३

**देवाने भाकित केलेली वचने कोणती.**

१. ख्रिस्ताची मंडळी कोण रचील ? : ..................................................

..................................................................................

२. ते राज्य कशाने, कशानिशी उदयास येईल ? ..............................

..................................................................................

३. काय घोषित केल्या जाईल ? ..................................................

..................................................................................

४. किती राष्ट्रामध्ये ते घोषित केल्या जाईल ? ..............................

..................................................................................

५. कोणाच्या नामामध्ये या गोष्टी घोषित केल्या जाईल ?

..................................................................................

**प्रेषित दुसऱ्या अध्यायाच्याद्वारे प्रश्नाची उत्तरे लिहा.**

१. आत्मा कोणास मिळाला ?. ..................................................

..................................................................................

२. त्याची चिन्हे कोणती ?..................................................

..................................................................................

३. ख्रिस्त देवाचा पुत्र होता याविषयी पेत्राने लोकांची खात्री कशी करून दिली ? ..................................................

४. लोकसमुदायाने कोणते प्रश्न विचारले ? ..................................

..................................................................................

५. मंडळीमध्ये तारण पावलेल्यांची कोणी भर घातली ? ..................

..................................................................................

**व्याख्या लिहा.**

१. मंडळी : ..........................................................................

..........................................................................................

२. भविष्यवाणी : ............................................................

..........................................................................................

३. पन्नासावा दिवस : ......................................................

..........................................................................................

४. पश्चाताप : ..................................................................

..........................................................................................

५. बाप्तिस्मा: ....................................................................

..........................................................................................

**कृपया खालील वाक्य कोणी म्हटले ते लिहा ?**

१. "तो त्याची मंडळी रचील" असे कोण म्हणाला ?

..........................................................................................

२. देव म्हणाला, शेवटच्या दिवसात असे घडून येईल की मी माझ्या आत्म्याचा मनुष्यमात्रावर वर्षाव करील असे कोणी सांगितले ?

..........................................................................................

३. परमेश्वराने माझ्या प्रभूला सांगितले तू माझ्या उजवीकडे बैस असे कोण म्हणाला ?

..........................................................................................

४. पश्चाताप करा आणि पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नामात बाप्तिस्मा घ्या असे कोण म्हणाला ?

..........................................................................................

५. या दुष्ट पिढीपासून अलिप्त राहा असे कोण म्हणाला ?

..........................................................................................

**कृपया या पाठातील भविष्यवाणी लिहा.**

१. देवाचे राज्य केव्हा स्थापन होणार होते ? ....................................

..................................................................................................

२. ते कोणत्या नगरात स्थापन होणार होते ? ....................................

..................................................................................................

३. त्यामध्ये किती लोक सामील होणार होते ? ....................................

..................................................................................................

४. ते कसे उदयास यावयाचे होते ? ....................................

..................................................................................................

५. ते किती काळपर्यंत टिकणारे होते ? ....................................

..................................................................................................

# पाठ -४

**योग्य उत्तरे लिहा.**

१. हरविलेल्या मित्राचा शोध तुम्ही कसा कराल ? ....................................

..................................................................................................

२. आज जगात पुष्कळ पंथीय मंडळ्या आहेत काय? ....................................

..................................................................................................

३. कोणती मंडळी योग्य आहे हे कसे ओळखता येईल. ....................................

..................................................................................................

४. मंडळीची लक्षणे कोठे आढळतात ? ....................................

..................................................................................................

५. मंडळी कोणी स्थापन केली ? ....................................

..................................................................................................

६. तिचा उदय कोठे झाला ? ........................................................

..........................................................................................

७. ती केव्हा स्थापन झाली ? ..................................................

..........................................................................................

८. तिचे नाव कोणते ? ............................................................

..........................................................................................

९. शरीर म्हणजे काय ? ..........................................................

